साप्ताहिक

शनिवार
२० मार्च १९८२

# माणूस

किंमत
एक रुपया

# मुंबई मराठी लोकांची ! ठीक आहे. मग भारत कुणाचा ?

१८६७ मध्ये, म्हणजे सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी बंगालमध्ये 'हिंदू मेळा' नावाची संस्था स्थापन झाली. या मेळ्याच्या चौथ्या अधिवेशनानंतर म्हणजे १८७१ मध्ये 'नॅशनल सोसायटी' नावाची संस्था स्थापन करण्यात आली. हिंदू समाजात ऐक्य नि राष्ट्रीय वृत्ती यांचा परिपोष व्हावा हे या संस्थेचे ध्येय होते. तिच्यातर्फे दर महिन्यास एक व्याख्यान आयोजित केले जात असे. या व्याख्यानाच्या सत्रात एकदा राजनारायण बोस यांचे व्याख्यान झाले. त्यात हिंदु धर्माच्या श्रेष्ठतेवर त्यांनी भर दिला होता. या व्याख्यानानंतर एक वाद सुरू झाला आणि ख्रिश्चन लोक आणि ब्राह्मोसमाजी लोक यांनी सभा घेऊन श्री. बोस यांच्या मताला विरोध केला. मेळाव्याचा आवाका हिंदू समाजापुरता मर्यादित असल्याने 'राष्ट्रीय' शब्दाच्या वापराला या लोकांकडून आक्षेप घेण्यात आला. तेव्हा हिंदू मेळ्याचे मुखपत्र 'नॅशनल पेपर' याने त्या आक्षेपाला पुढील उत्तर दिले—

'आमच्या पत्रलेखकाने हिंदूंविरुद्ध का आक्षेप घ्यावा हे आम्हाला समजत नाही. कारण हिंदू हे स्वतः राष्ट्र आहेत. तेव्हा या राष्ट्रीय समाजाने स्थापन केलेल्या संस्थेला राष्ट्रीय म्हणणे योग्यच आहे.'

हिंदुत्व विचाराचे सुप्रसिद्ध अभ्यासक श्री. ज. द. जोगळेकर यांनी नोंदवलेल्या वरील माहितीवरून असे दिसते की, हिंदु राष्ट्रवाद हा जुनाच आहे आणि त्यावरील आक्षेपही जुनेच आहेत. आक्षेप घेणाऱ्या मंडळींचे गट व काळ बदलला असला तरी आक्षेपकांची प्रवृत्तीही तीच आहे. वरील वाद झाला तेव्हा सावरकरांचा, संघाचा किंवा हेडगेवारांचा जन्मही झालेला नव्हता ! पाकिस्तानची कल्पनाही तेव्हा अस्तित्वात नव्हती. अलीगड विद्यापीठ नव्हते. उलट या देशात जो पिढ्यानुपिढ्या राहतो, इथल्या संस्कृतीचा जो स्वतःला घटक मानतो तो सारा समाज म्हणजे हिंदू समाज, अशीच इथली सर्वसाधारण लोकभावना होती. शेवटचा मोगल बादशहा बहादुरशहा जफर जेव्हा इंग्रजांना उद्देशून आपला सुप्रसिद्ध शेर लिहितो, तेव्हा तो 'तेग हिंदोस्तॉनकी' अशीच शब्दरचना करतो, हिंदीस्तान म्हणत नाही. शिवाजीचे 'हिंदवी स्वराज्य' आणि बहादुरशहा जफरचे 'हिंदोस्तॉं' या दोन्हीतून व्यक्त होणारी भावना एकच होती. ती म्हणजे या भूमीविषयी, इथल्या परंपरेविषयी, संस्कृतीविषयी ममत्वाची भावना ! 'हिंदू' हा शब्द कॉंग्रेसच्या जन्मापूर्वी या व्यापक व सर्वसमावेपक अर्थानेच वापरला जात होता, हे जोगळेकरांसारख्या हिंदुत्वाभ्यासकांनी आता पुरेसे सिद्ध केलेले आहे. अलीगडचे संस्थापक सय्यद अहमद खान यांचे एक उदाहरण तर फारच बोलके आहे. 'हिस्टरी ऑफ दि फ्रीडम मुव्हमेंट इन इंडिया' या आपल्या ग्रंथमालेच्या दुसऱ्या खंडात (पृ. ३५८) हे उदाहरण डॉ. ताराचंद यांनीच नोंदवलेले आहे. डॉ. ताराचंद लिहितात, "सय्यद अहमद खान यांनी आपल्याला हिंदू का समजण्यात येऊ नये याबद्दल पंजाबमधल्या एका हिंदूंच्या सभेत तक्रार केली. ते म्हणाले की, 'तुम्ही स्वतःपुरता हिंदू शब्दाचा उपयोग केला आहे हे बरोबर नाही. कारण माझ्या मते (म्हणजे सय्यद अहमद खान यांच्या मते) हिंदू शब्दाने विशिष्ट असा संप्रदाय दर्शविला जात नाही. उलट हिंदुस्थानात राहणाऱ्या प्रत्येकाला स्वतःला हिंदू म्हणवून घेण्याचा अधिकार आहे. मला वाईट वाटते की, मी हिंदुस्थानात राहत असूनही तुम्ही मला हिंदू समजत नाही.'" हिंदू म्हणजे एतद्देशीय परंपरेविषयी ममत्व असणारा माणूस. इथल्या संस्कृतीचा आपल्याला घटक समजणारा समाज तो हिंदू समाज. अशी जर ममत्वाची, घटकत्वाची भावना नसेल तर समाजाचे राष्ट्रात रूपांतर होणे कठीण असते. जगात बहुतेक

ठिकाणी राष्ट्रवादाचीनिर्मिती अशी परंपरेतील एकत्वाच्या, ममत्वाच्या, सातत्याच्या घटकां॰ वर आधारित असलेली आपल्याला दिसते.

विस्कळित हिंदू समाजाचे एकात्म हिंदुराष्ट्रात रूपांतर होणे परकीय सत्ताधाऱ्याना अर्थातच धोकादायक वाटू लागले. म्हणून एकात्मतेचे खच्चीकरण सुरू झाले. मुसलमानांना हिंदूपासून प्रथम अलग पाडले गेले. जे सय्यद अहमद खान 'मला हिंदू म्हणवून घेण्याचा अधिकार आहे' असे म्हणत होते, तेच अलिगढ विद्यापीठाच्या स्थापनेकडे वळले, वेगळेपणा जोपासू लागले. दुसरा प्रवाह होता तो समाजसुधारकाचा. हिंदु समाजातील काही दुष्ट चालीरीतीविरुद्ध या सुधारकांनी एकीकडे चळवळी जरूर केल्या; पण या चळवळी करताना दुष्ट चालीरीती म्हणजेच हिंदू समाज, असे समीकरण मनात धरून हिंदू या शब्दाचा, हिंदुत्वाचा द्वेषही त्यानी फैलावला. काँग्रेस सुरुवातीला या प्रवृत्तीच्या लोकांच्या ताब्यात होती. त्यामुळे राष्ट्रवाद म्हणजे हिंदुद्वेष, हे समीकरण घट्ट होत गेले. मुसलमानानी तर हा शब्द टाकलाच; पण मुसलमानांनी राष्ट्रीय प्रवाहात, काँग्रेसच्या चळवळीत सामील व्हावे म्हणून काँग्रेसनेही हा शब्द टाकण्याची तयारी दाखवली. टिळक-काळात निदान हिंदू आणि हिंदी हे दोन्ही शब्द वापरात तरी होते. हिंदी ऐक्यासाठी हिंदुत्वावर पाणी सोडायची टिळकांची भूमिका नव्हती; पण त्या दिशेने वाटचाल सुरू मात्र झालेली होती. गाधी–नेहरू काळात तर या वाटचालीला भलताच वेग आला, हिंदू शब्दाला सोडचिठ्ठीच दिली गेली! काँग्रेसी राष्ट्रवाद आणि ब्रिटिशधार्जिणा समाजसुधारणावाद यानी 'हिंदू' शब्द उच्चारणे पापच ठरवून टाकले. हिंदू बहुसंख्य असलेल्या देशात हिंदूंचाच तेजोभंग होऊ लागला. आजही तो सुरूच आहे!

येत्या २० मार्चला पुण्याला भरणारी राष्ट्रीय एकात्मता परिषद म्हणजे याच पूर्वापार हिंदुविरोधाचा नवा आविष्कार आहे. गेल्याच महिन्यात विश्व हिंदूतर्फे एक जनजागरणाचा कार्यक्रम झाला: त्याला उत्तर देण्यासाठी ही राष्ट्रीय एकात्मता परिषद योजली गेली, हे उघड आहे. विनोद म्हणजे, एके काळी संयुक्त महाराष्ट्रासाठी झटलेली, मुबईवर मराठी जनतेचा हक्क सांगणारी मंडळीच या परिषदेच्या मुळाशी आहेत. मुंबईत अठरापगड जातीचे लोक राहतात. अनेक प्रांतांचे, धर्मांचे लोक मुंबईत आहेत. अ–मराठी कामगार आहेत, तसे अ–मराठी भांडवलदारही मुंबईत आहेत. असे आहे तर मग मुबई केवळ मराठी माणसाची कशी ठरते? जे मुंबईत राहतात त्या सर्वांची मुंबई आहे, असे समजायला हवे; पण तसे समजले गेले नाही. मुबईवर मराठी जनतेचा हक्क सागितला गेला. तिच्यासाठी एकशेपाच हुतात्म्याचे रक्तही सांडले गेले! मुंबई महाराष्ट्राची, मराठी जनतेची आहे, असे म्हटल्यावर मुंबईतल्या पंजाब्याना, दाक्षिणात्याना काय वाटेल, याची चौकशी त्या वेळी या मंडळीनी केली होती का? गुजराथी तर मुबईशी एकरूप झालेले. त्यांचा हक्क जराही मान्य करण्यात आला नाही. का? दशकानुदशके मुबईत राहणाऱ्यांच्या भावनांचा विचार न करता त्या वेळी मुबईवर मराठी जनतेने हक्क सांगितला, प्रस्थापित केला, तो कशाच्या आधारावर? 'बहुसंख्या' हाच प्रमुख निकष त्या वेळी आधार म्हणून मानला गेला. मुंबईत बहुसंख्य लोक मराठी आहेत यावरून मुबई जर मराठी जनतेची ठरते, ठरली, तर त्याच न्यायाने या देशात हिंदू बहुसंख्य आहेत म्हणून हा देश हिंदूंचा आहे, हे हिंदूराष्ट्र आहे, असे म्हणण्यात काय गैर आहे? मुंबई महाराष्ट्राची म्हणजेच मराठी जनतेची आहे, असे म्हटल्यावर गुजराथ्यांनी किंवा इतरांनी मुंबईत राहू नये, मुबई सोडून निघून जावे, असा अर्थ निघत नाही. तसेच हा देश बहुसंख्यांक या न्यायाने हिंदूचा आहे, असे म्हटल्यावर मुसलमानानी, ख्रिश्चनांनी किंवा इतरांनी हद्दपार व्हावे, असा अर्थ त्यातून निघत नाही, निघू नये. तसा तो मुद्दाम काढला जात आहे. यामागे 'हिंदू' या शब्दाविषयीचा द्वेष याशिवाय दुसरे–तिसरे कुठलेही कारण नाही. तो जुना असल्याने जायला थोडा वेळ लागेल. तोवर मुबईवर मराठी जनतेचा हक्क सागून, हिंदुस्थानवर हिंदूचा हक्क नाकारण्यातला विनोद आणि विसगती आपल्याला सहन करीत राहिलेच पाहिजे! ¤

२० मार्चच्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेतर्फे प्रचारासाठी बिल्ले काढण्यात आलेले आहेत. 'आम्ही भारतीय आहोत, भारतीयत्वाचा आम्हाला अभिमान आहे', असे त्यावर लिहिलेले आहे. कुणीही असा प्रश्न विचारेल की, 'बाबांनो! या भारतीयत्वाची तरी व्याख्या काय?' जी व्याख्या हिंदूची, हिंदुत्वाची, तीच व्याख्या शेवटी भारतीयत्वाची करावी लागते. भारतात केवळ एकत्र राहिल्याने कुणी भारतीय ठरत नाही. दीडशे वर्षे इंग्रज येथे राहिले. काहीचा जन्मही भारतात झाला असेल! मग ब्रिटिशांना आपण भारतीय म्हणणार का? आसामात चार-चार पिढ्या


## साप्ताहिक माणूस

वर्ष : एकविसावे

अंक : बेचाळिसावा

२० मार्च १९८२

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

स्थायीक झालेले पाकिस्तानी-बांगलादेशीय आहेत. का त्याना परकीय ठरवून हाकलून लावायचे ? कारण एकच. ते जरी भारतात राहत असले तरी भारतीय परपरा ही आपली परंपरा आहे, असे ते मानत नाहीत. भारतीय कोण ? जो आसेतुहिमालय पसरलेल्या भूमीला आपली भूमी मानतो व व्यास-वाल्मिकीं-पासून टिळक-गांधीपर्यंत चालत आलेल्या परंपरेचा जो स्वतःला वारस समजतो, या परंपरेबद्दल योग्य तो डोळस अभिमान बाळगतो, तो भारतीय. हाच राष्ट्रवादाचा आशय सावरकरांनी 'पितृभू' आणि 'पुण्यभू' हे दोन शब्द वापरून सुटसुटीतपणे व्यक्त केलेला आहे. परंपरेचा काही भाग चांगला असेल, काही वाईट व टाकाऊ असेल; पण राष्ट्रवाद एकदा मान्य केला की, परंपरेचे घटकत्व मान्य करावेच लागते. आणि आजतागायतची भारतीय परंपरा ही मूलतः आणि मुख्यतः हिंदू परंपरा आहे, 'हेही नाकारून चालत नाही ! म्हणून हिंदू आणि भारतीय हे दोन्ही शब्द समानार्थाने वापरण्याचा रा. स्व. संघाचा पर्यायच सद्यःस्थितीत योग्य आहे. जोवर हिंदू या शब्दाबद्दल आकस आहे, जाणूनबुजून या शब्दाचा द्वेष केला जात आहे, तोवर केवळ 'भारतीय' या शब्दाचा स्वीकार करणे धोकादायक आहे. हिंदी राष्ट्रवाद पूर्वी जसा रुजला नाही, तसेच हिंदुत्वाच्या द्वेषावर उभा राहू पाहणारा हा आत्मविसंगत भारतीय राष्ट्रवादही येथे रुजणार नाही. कारण त्याचा पायाच ढिसूळ राहील. केवळ प्रादेशिक तत्त्वावर कुठलाच राष्ट्रवाद कुठेच आजवर तरी उभा राहिलेला नाही !

¤

डावी मंडळी राष्ट्रवादाकडे वळत असतील तर हे एक बरे लक्षणच आहे; पण मार्क्सवादी-समाजवादी तत्त्वज्ञानात राष्ट्रवादाला स्थान नाही, हेही ध्यानात ठेवायला हवे. राष्ट्रवादाचा खाजगी मालकीशी जवळचा संबंध आहे. मध्यमवर्गीयांचे हे तत्त्वज्ञान ! कामगारवर्ग हा आंतरराष्ट्रवादीच असायला हवा ! मार्क्सवादी-समाजवादी मंडळीनी स्वतःला भारतीय म्हणवून घेणे, भारतीयत्वाबद्दल अभिमान वगैरे बाळगणे, हाही एक संकुचितपणाच आहे. हिंदू हे विश्ववादाकडे चालले असता, मार्क्स-लेनिनला भारतीयत्वात कोंडणे, हे 'पाऊल पुढचे' की मागचे ?

— श्री. ग. मा.

## पुणे वार्ता

# अनोखे 'सौभद्र'

'आधी केले मग सांगितले' ही उक्ती आम्ही सार्थ केली आहे, हे मी अभिमानाने सांगतो. ज्या ग्रामीण भागातील ४।५ वर्षांची धनगर मुले मेंढरांच्या कळपामागे जात होती त्यांना आम्ही आमच्या बालवाड्यात आणले आणि शिक्षणाची गोडी त्यांच्यात निर्माण केली. ज्या समाजातील मुलींना सांस्कृतिक अंगाची ओळख नव्हती त्यांच्याकडून आम्ही 'सौभद्र' नाटय बसवून घेतलं. हे सगळं काम अवघ्या ३।४ वर्षांतलं. शिरूर, हवेली भागात सध्या सुमारे ५० बालवाड्या आम्ही चालवतो. हा सगळा भाग पुण्यापासून अगदी जवळ असला तरी इतर ग्रामीण भागासारखाच मागासलेला. रस्ते नाहीत, पाणी नाही, शिक्षणाची सोय नाही; परंतु निर्मलाबाई पुरंदरे यांनी पायी किंवा मिळेल त्या वाहनाने हिंडून बालवाड्यांचे काम इथे रुजवले. त्यासाठी शिक्षिका तयार केल्या व या शिक्षिकांमार्फत आज 'सौभद्र'चा प्रयोग सादर केलेला तुम्ही पहातच आहात. या कार्याला आपले सहकार्य लाभावे.'

दि. १० मार्चला पुण्याच्या भरत नाटय मंदिरात शिरूरच्या ग्रामीण भागातल्या मुलींनी बसवलेला 'सौभद्र'चा प्रयोग झाला. पहिल्या दोन अंकांनंतर वनस्थळी ग्रामीण विकास केंद्राबद्दल माहिती देताना, या केंद्राचे एक विश्वस्त श्री. बोराडे यांनी वरील उद्गार काढले.

वनस्थळी विकास केंद्र ग्रामीण भागातल्या मुलींना आता परकं वाटत नाही. 'सौभद्र' मध्ये अर्जुनाचं काम करणारी कु. उपलेंचवार म्हणाली, 'निर्मलाताईंनी आमच्यात इतकी आपुलकी निर्माण केली की, त्या आम्हाला आईच वाटतात. आम्ही सर्व मुली त्यांच्याशी मोकळेपणानं बोलू शकतो, चर्चा करून निर्णय घेतो. आमच्या नाटकात सुभद्रेचं काम करणारी कलाकार रोज कॉलेज करून तळेगाव ढमढेरेपासून शिरूरला प्रॅक्टिसला येत होती. आम्ही निर्मलाताईंकडून दिलेली वेळ, दिलेला शब्द पाळायला शिकलो. त्यामुळं तालमी वेळच्या वेळी संपत.'

वनस्थळीबद्दल बोलताना स्वतः निर्मलाताई म्हणाल्या, 'घर-संसार आणि मुलंबाळं या एकच एक कंटाळवाण्या चक्रात ग्रामीण स्त्री वर्षानुवर्षे विनातक्रार फिरते आहे. जीवनात आनंद निर्माण होण्यासाठी इतर सांस्कृतिक, वैचारिक देवाण-घेवाणीची, कलाजीवनाची गरज आहे, हे ग्रामीण स्त्रीला माहीत नाही असं नाही; पण तशी संधी त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे, झगडणे ही शहरी शिक्षित, सुसंस्कृत स्त्रीची जबाबदारी आहे, याची जाणीव शहरात अत्यल्प आहे.'

या पार्श्वभूमीवर वनस्थळीचं जोमानं चाललेलं काम विशेष महत्त्वाचं, लक्षणीय आहे.

'सौभद्र'चा हा प्रयोग मात्र खरोखरच रंगत गेला. कलाकारांची गाण्यातली तयारी, अभिनयाची जाण, हालचालीतील नेटकेपणा आणि आत्मविश्वास ही प्रयोगाची वैशिष्ट्ये 'किती किती सांगू तुला', 'अरसिक किती हा शेला', 'वद जाउ कुणाला शरण', 'प्रिये पहा' यांसारख्या लोकप्रिय गाण्यांना श्रोत्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. नाट्याचार्य खाडिलकरांचे हे शिवधनुष्य पाळणं तसं अवघडच; पण कलाकारांची चोख तयारी पाहिल्यावर, त्यांचं रंगभूमीवर हे पहिलंच पदार्पण आहे, हे खरं वाटलं नाही. याचं श्रेय नाटकाचे संगीत-दिग्दर्शक श्री. म्हसकोकराकडे जातं. ते म्हणाले, 'ज्याना संगीतातली सरगमसुद्धा माहीत नाही, त्यांच्याकडून हे नाटक बसवून घ्यायची भीती वाटत होती; पण कलाकारांची चिकाटी आणि उत्साह यामुळंच हे साधता आलं.'

वनस्थळीने पुण्यात केलेला 'सौभद्र'चा प्रयोग आणि घेतलेली पसंतीची पावती ही एक achievement आहे. ग्रामीण भागात फक्त तमाशाच कळतो असं आपल्या शहरी संस्कृतीनी ठरवलं; पण ते खरं नाही. 'सौभद्र'-ही तितकंच 'अपील' होऊ शकतं. यामुळं जी सांस्कृतिक एकसंधता निर्माण होईल तिने एकात्मतेसारख्या पुस्तकी शब्दाला अर्थ मिळू शकेल.

ट्रस्टचं काम वाढविण्यासाठी बौद्धिक व शारीरिक बळाची तसच पैशाचीही गरज आहे. "आर्थिक अडचणीमुळे ट्रस्टवर 'वद जाउ कुणाला शरण' असं म्हणायची वेळ येऊ नये" असं प्रयोगाच्या मध्यंतरात 'माणूस'चे श्री. ग. माजगावकर म्हणाले ते खरच आहे.

— मेघा देशपांडे

मुंबई वार्ता

# मीडियाची कहाणी

आंतरराष्ट्रीय महिलादिनाच्या निमित्तानं नुकताच मुंबईत एक चांगला कार्यक्रम झाला. 'सिनेवुमन' या संस्थेनं स्त्री आणि स्त्री-समस्याविषयक देशी-विदेशी चित्रपटांचा एक महोत्सव आयोजित केला होता. 'सिनेवुमन' ही नुकतीच सुरू झालेली एक चळवळ, त्यांच्याच शब्दात सागायचं तर, 'इंडियाज फर्स्ट इंटरनॅशनल फोरम ऑफ विमेन्स सिनेमा.' स्त्रीविषयक चित्रपटांचं आयोजन, प्रदर्शन, त्यावर चर्चासत्रं आयोजित करणं हा या फोरमच्या स्थापनेमागचा हेतू. बालचित्रपटाची जशी सामाजिक उणीव आपल्याला भासते, तशीच चांगल्या स्त्रीविषयक चित्रपटाचीही कमतरता आहे. समाजाचा अर्धा हिस्सा व्यापून असणाऱ्या घटकाचं जीवन यथार्थपणे चित्रित करणाऱ्या, त्यांच्या समस्यांची उकल तर सोडाच, पण त्यांचं जेन्युइन ऑथेन्टिक चित्रण करणाऱ्या चित्रपटांची फार मोठी गरज आहे. 'रिफ्लेक्शन अँड रिॲलिटी' या पहिल्याच जर्नलच्या संपादकीयात लिहिताना संपादिकांनी लिहिलं आहे की, स्त्रियांसाठी वेगळा सिने-फोरम कशासाठी? पुरुषांसाठी तर त्याची काही आवश्यकता भासत नाही- असा प्रश्न नेहमीच विचारला जातो. त्याला उत्तर हे आहे की, चित्रपटातून, विशेषत: भारतीय, हिंदी चित्रपटांतून जे उथळ स्त्री-दर्शन घडवलं जातं, त्याला कुठे तरी पायबंद बसलाच पाहिजे! ही स्त्री-पात्रं केवळ काळ्या आणि पांढऱ्या एवढ्या दोनच भडक रंगांत रंगवलेली असतात. चागुलपणा, सहनशीलता, पावित्र्य, पातिव्रत्य आणि कॉमनसेन्सचा संपूर्ण अभाव इत्यादी सकलगुणालंकृत अशा या स्त्रियाचं दर्शन हे स्त्री जातीला अन्यायकारक आहे आणि स्त्रीविषयक गैरसमजांना खत-पाणी घालणारं आहे. आम्ही दाखवत असलेल्या चित्रपटांनी फार मोठी क्रांती नजीकच्या भविष्यात घडून येईल, असा काही आमचा दावा नाही; पण या चर्चा आणि चित्रपटामधून स्त्रियांना आणि एकूणच समाजाला स्त्रियांच्या परिस्थितीची,स्थानाची, समस्याची निदान जाणीव तरी होऊ लागेल!

आठवडाभर चाललेल्या या चित्रपटमहोत्सवात भारत, क्यूबा, ग्रीस, जपान, हंगेरी, रशिया, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, ऑस्ट्रिया अशा विविध पाश्चात्य आणि पौर्वात्य राष्ट्रांचे सुमारे पंधरा चित्रपट दाखवले गेले. 'दुनिया ना माने' (कुंकू), 'महानगर' आणि 'एक दिन-प्रतिदिन' या भारतीय चित्रपटांनी भारताचं प्रतिनिधित्व केलं होतं. देशोदेशीचे निवडक चित्रपट असल्यामुळं, संपूर्ण महोत्सव एका वेगळ्याच पातळीवर होता आणि प्रत्येक चित्रपट नावाजण्याजोगा होता. उदाहरणादाखल म्हणून जुलिस दासिनच्या 'अ ड्रीम ऑफ पॅशन' या ग्रीक चित्रपटाबद्दल सांगता येईल. 'कॉज ऑफ विमेन'शी कमिटमेंट असणारा, पण मुख्यत: उच्च कलात्मक दर्जा असलेला, सूक्ष्मपणे मनाला भिडणारा असा हा चित्रपट आहे. त्याच्या शेवटी कुठलेही नैतिक निष्कर्ष, उपदेश नाहीत; पण चित्रपट एखाद्या अचूक बाणासारखा प्रेक्षकांचा वेध घेतो. संपूर्ण जगभर अतिशय गाजलेल्या या चित्रपटात ग्रीक पुराणातील मिडियाची कथा आणि तिच्या नाट्यरूपांतराच्या निमित्तानं उलगडत जाणारी एक समान्तर जीवनकथा यांचं चित्रण आहे. ग्रीक पुराणातील जगभरच्या साहित्यिकांना, मानसशास्त्रज्ञांना आणि विचारवंतांना मानवी स्वभाववैशिष्ट्यांचे आदिम नमुने-आर्किटाइपस्-पुरवले आहेत. माणसाचा आदिम, रानटी स्वभाव आणि इन्स्टिंक्टस् आणि संस्कृतीच्या उत्क्रांतीनं त्यावर घडवलेले संस्कार या साऱ्याचा सखोल आणि नि.संकोचपणे स्पष्ट विचार ग्रीक पुराण-कथातून येतो.

इडिपस, प्रॉमिथस, नार्सिसस, अँडनेमिस तशीच झपाटून टाकणारी कथा मिडियाची. पुराणकथातून येणारी ग्रीक व्यक्तिमत्त्वं ही नेहमी कणखर असतात, ताठ असतात, पुरुषी वळणाची असतात. अखेरीस त्याच्यातल्याच एखाद्या चुकीमुळं त्यांचा अध:पात होऊन शोकांतिका होते. त्याच्या भाव-भावना त्याच्या ताब्यात असतात; पण त्या एकदा अनावर झाल्या की मग संपूर्ण उत्पात आणि अंधार, एवढंच शिल्लक रहातं. मुळात युरिपीडिसने नाट्यरूपांतर केलेल्या या कथेतली मीडिया, जेसनने, आपल्या नवऱ्यानं कॉरिन्थच्या राजकन्येशी संबंध ठेवले, आपल्याला मुलांसह हद्दपार केलं म्हणून चिडून, नवऱ्यावर सूड उगवण्यासाठी आपल्या तिन्ही मुलांची हत्या करते. माया-विसाव्या शतकातली एक नामांकित ग्रीक नटी या कथेचं दूरदर्शनसाठी चित्रीकरण करत असताना काय घडतं, हा या चित्रपटाचा विषय आहे. एक पब्लिसिटी स्टंट म्हणून माया ब्रेंडाला भेटायचं ठरवते. ब्रेंडा ही आता तुरुंगवजा मनोरुग्णालयात दिवस कंठणारी सायकॅटिक स्त्री! मिडियाच्या परिस्थितीत सापडून तिनंही आपल्या प्राणाहून प्रिय मुलांची हत्या केलेली असते आणि या वासनेची, अनावर भावनाची किंमत आयुष्यभर दु:खात जळत राहून ती चुकवत असते. वयाच्या अठराव्या वर्षी, नको असलेल्या गरोदरपणापासून आपण कशी सुटका मिळवली याची आठवण मायाच्या मनात असते. या पार्श्वभूमीवर पौराणिक मीडिया, प्रौढ माया आणि तरुण ब्रेंडा ही सारी व्यक्तिमत्त्वं एकात एक मिसळतात आणि शेवटी उभं रहातं, ते दुर्दम्य भावनाच्या आणि स्वप्नांच्या गुतागुतीनं, गाढ नैराश्यानं येणार अथांग दु.ख. चित्रपटाचा हा अर्थ विषासारखा हळूहळू भिनत जातो आणि 'ही घटना आज इथे घडली' हा मीडियाच्या नाटकाचा 'कोरस'नं केलेला शेवट प्रेक्षकाला हतबुद्ध करतो!

आदिम स्वभावाच्या पौराणिक मीडियाचं विसाव्या शतकाशी नातं काय? 'सिनेवुमन'नं अशी निवड का करावी? - कारण एकच, मीडियाचा प्रश्न सनातन आहे. १९८२ सालातल्या स्त्रीलाही भेडसावणारा आहे. स्त्री म्हणून सामोऱ्या आलेल्या प्रश्नावर माणूस म्हणून मीडियाचा जो प्रक्षोभ झाला त्याची ही कहाणी आहे. जुलमी परिस्थितीनं भडकून केलेल्या सर्वनाशाची, असीम दु:खाची, स्त्रीमधल्या पाशवी माणूसपणाची ही भेदक शोकान्तिका आहे. इडिपसच्या शोकान्तिकेसारखीच तीदेखील सूक्ष्मपणे वैयक्तिक पातळीवर भिडते आणि तोच तिचा उद्देश आहे.

## पालखीवाला यांचे भाषण

गेल्या महिन्याच्या अखेरीस ८२-८३ सालासाठीचा अर्थसंकल्प सालाबादप्रमाणेच सादर झाला. अर्थसंकल्प या प्रकाराचं नातं

पृष्ठ २३ वर

स. शि. भावे

## राष्ट्रीय एकात्मतेसाठी

# आधुनिकतेची मूल्यसरणीच हवी

आज ३० फाल्गुन. सौर शक १९०३ या वर्षाचा शेवटचा दिवस. उद्या सौर चैत्र १. १९०४ चा पहिला दिवस. नव्या वर्षाच्या या पहिल्या दिवशी आपले नवे संकल्प कोणते असणार ?

या प्रश्नाच्याही आधी एक प्रश्न मनात येतो. भारताने अधिकृतपणे स्वीकारलेला हा नवा सौर शक, ही नवी वर्षगणना आणि त्यातले हे जुने-नवे वर्ष–हे सारे आपण कितीजण मानतो ?

उद्या पुण्यात भारतीय एकात्मता परिषद भरते आहे. या परिषदेने, आणि या परिषदेच्या निमित्ताने आपण सर्वांनी, विचारात घ्यावा असा महत्त्वाचा हा प्रश्न आहे.

आपण सारे भारतीय ! पण आपणा सर्वांची कालगणनादेखील एक नाही. मुसलमानांची वेगळी. ख्रिस्त्यांची वेगळी. शीख व बौद्ध यांनी अजून वेगळी कालगणना सुरू केलेली नाही. पण तेही सुरू करतील. तशी प्रसादचिन्हे आहेत.

हिंदूचे काय ? हिंदू म्हणजे भारतीय अशी काहींची घोषणा असते. ही घोषणा करणाऱ्याची तरी कालगणना एक असावी, अशी रास्त अपेक्षा करता येईल; पण तसे दिसत नाही. संवत आणि शक अशा दोन मुख्य प्रथा आहेत. (खरे म्हणजे, आर्य हिंदुत्वाचा अभिमान बाळगणाऱ्याचा भारतीयेतर शकांनी सुरू केलेल्या कालगणनेशी काय संबंध, असा प्रश्न विचारता येईल. पण तूर्त हा प्रश्न राहू दे. ) विक्रम संवताच्या महिन्याची सुरुवात कृष्णपक्षापासून होते, तर शालिवाहन शकाची शुक्ल पक्षापासून होते.

शक मानणारे तरी एक कालगणना मानतात काय ? तर तसेही नाही. त्यातही जुने पंचांग व टिळकपंचांग अशी दोन पंचांगे आहेत. एकात एक अधिक मास. तर दुसऱ्यात दुसराच, म्हणजे एकाची हनुमानजयंती चालू असते तेव्हा दुसऱ्याचा शिमगा सुरू असतो !

वंदनीय श्रेष्ठ पुरुषांविषयी आपणांस जो आदर वाटतो त्या आदराची आपण कदर करतो का ? तर तसेही नाही. लोकमान्य टिळकांविषयी परमादर असणारे कितीएक तितक्याच कडव्या निष्ठेने जुने पंचांग वापरतात !

बरे, यात परंपरेचा; भारतीयत्वाचा अभिमान असतो का ? तर तसेही दिसत नाही. का की व्यवहारात हे सर्रास ख्रिस्त्यांचे पंचांग अनुसरतात. याना रोजचे पंच+अंग माहीत असते काय ? तर तसे माहितगार शोधूनच काढावे लागतील !

म्हणजे पुरुषप्रामाण्य नाही. परंपराप्रामाण्य नाही. मग निदान शास्त्रप्रामाण्य तरी ? तर तेही दिसत नाही. कारण शास्त्रप्रामाण्य असते तर आपण सर्वांनी नवे सौर पंचांग आनंदाने स्वीकारले असते.

¤

स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रयत्नाने भारत सरकारने सर्व ज्योतिर्विद, पंचांगपंडित, यांस याचारण केले परिषदा भरवल्या. या परिषदात बरीच 'भवति-न-भवति' चर्चा झाली चर्चेनंतर कार्याकार्यनिर्णय झाला. या निर्णयानुसार सौर पंचांग आले. साप्रतच्या सर्व पंचांगांत हेच पंचांग उजवे आहे, हे विचार केल्यास, कोणाही सुज्ञास पटेल.

उत्तर गोलार्धाच्या दृष्टीने वसंत-संपाताला विशेष महत्त्व आहे. म्हणून वसंतसंपाताला आपले हे सौर वर्ष सुरू होते. पूर्वीची आपली चैत्र शुद्ध प्रतिपदा याच दृष्टीतून निश्चित केली गेली असली पाहिजे. पण ती गणना चांद्रपद्धतीची असल्याने तीत ३६५ दिवसांची वार्षिक सौर गणना जशीच्या तशी बसत नाही. म्हणून सध्याचा वसंतसंपाताचा (उत्तरायणात सूर्य विषुववृत्तावर येण्याचा, दिवस व रात्र समान असण्याचा) दिवस जो २१ मार्च, तो नव्या सौरगणनेत वर्षाचा पहिला दिवस धरला आहे. स्वतंत्र भारताने, नव्याने आणि शास्त्रीय पद्धतीने विचार करून ठरविलेल्या या नव्या वर्षदिनाचे आपणास खरे म्हणजे केवढे महत्त्व वाटायला हवे ! हाच नवा पाडवा आपण सर्वांनी मानला पाहिजे आणि मानून रूढ केला पाहिजे.

या नव्या सौर भारतीय पंचांगाचे वैशिष्ट्य हे की, वसंत आणि शरत हे दोन संपात, आणि कर्क व मकर या दोन संक्रांती या चार महत्त्वाच्या बिंदूचे स्थान या पंचांगात पक्के आहे. त्यानुसार कोणत्या महिन्याचे तीस वा एकतीस दिवस हे पक्के केले आहे. त्यामुळे, या पंचांगात अधिक मास अथवा लुप्त मास येण्याची शक्यताच नाही. त्याचप्रमाणे, दर चार वर्षांनी 'उडीचं' (leap) वर्ष, व दर शंभर वर्षांनी ही उडी रद्द, असली ख्रिस्ती पंचांगातील आडनिडी करामतही आपल्या नव्या सौर पंचांगात करावी लागत नाही. असे हे पंचांग, सौर नियमनाने पूर्ण शास्त्रीय, आणि जास्तीत जास्त निर्दोष असे आपल्या शासनाने तयार केले आहे.

आपण सारे हे सौर पंचांग वापरीत तर नाहीच; पण असे नवे पंचांग आहे हेदेखील कितीएकास माहीत नसते ! भाषा, लिपी, संस्कृती यांसाठी हरघडी टाहो फोडणाऱ्या आपणांस शासनाच्या या कार्यासंबंधी केवढे कौतुक, केवढा अभिमान वाटला पाहिजे आणि केवढ्या आत्मीयतेने आपण त्याचा स्वीकार केला पाहिजे ! पण इतकी वर्षे झाली, अभिमान तर राहोच, या पंचांगाची पुरती माहितीदेखील आपणांस नाही !

हे कशाचे लक्षण समजायचे ? एकात्मतेचे ? भारतीय परंपरेच्या अभिमानाचे ? शास्त्रीय दृष्टिकोणाचे ? आधुनिकतेचे ? कशाचे ?

आपल्या वागण्याचे निरीक्षण केले तर

एवढेच दिसते की, वर सांगितल्यापैकी एकही प्रवृत्ती, एकही मूल्य आपणांजवळ नाही. आपण काहीही बोलू या, लिहू या, अगर छापू या—आपण खरे सोयवादी आहोत. त्या त्या वेळची नड भागवणे, तीही कमीत कमी बौद्धिक श्रमात भागवणे, हेच आपले धोरण असते. मग त्यात आपला व्यवहार हेंगाडा होतो आहे, याची आपल्याला पर्वा नसते.

आपल्या लग्नाच्या आणि मुंजीच्या निमंत्रणपत्रिका पाहाव्या. त्यात शक–मास–तिथी असे सारे असते. आणि इसवी सन–महिना–तारीख असेही असते. मुहूर्ताची घटिका–पळे असतात, तशी तास–मिनिटांची स्टॅ. टा. देखील असते. म्हणजे सूटबूट घालून वर पगडी असे ऐंशी-शंभर वर्षांपूर्वी असे, तसे!

हल्ली हेही कमी होते आहे. 'स. ११ वाजून ५३ मिनिटे या मुहूर्तावर' असे जुन्यानव्याचे एकीकरण हल्ली होऊ लागले आहे.

एकूण काय, तर पारंपारिक भारतीयत्वाचे पुरते ज्ञान नाही आणि नव्या, शास्त्रीय भारतीत्वाचेही पुरते ज्ञान नाही, अशी ही स्थिती आहे! जुने काय याविषयी आस्थेचा पुकारा बहुत होतो; पण खरी आस्था दिसत नाही!

¤

आज हे सारे विचार मनात येण्याचे कारण एक तर उद्या शक १९०४ हे नवे भारतीय सौर वर्ष सुरू होत आहे. 'माणूस' च्या वाचकांना या नव्या वर्षाच्या शुभेच्छा!

दुसरे कारण म्हणजे उद्या पुण्यात होणारी भारतीय एकात्मता परिषद.

या परिषदेत कोण कोण भाग घेतात, तिथे कोणकोणते विचार मांडले जातात, कोणकोणते निर्णय घेतले जातात, त्यांच्या अंमलबजावणीसाठी कोणकोणते मार्ग ठरविले जातात—असे सर्वांशी कुतूहल या परिषदेसंबंधी सर्वांच्या मनात आहे. म्हणूनच या निमित्ताने येथे काही विचारांचा जाहीर उच्चार करणे हे इष्ट वाटते.

१. पहिला विचार असा मनात येतो की, राष्ट्रीय एकात्मतेचा विचार आजच्या आणि उद्याच्या काळाची जाणीव ठेवूनच व्हावा. भूतकाळापासून शिकलेले धडे या विचारात असावे; पण भूतकाळाची जाणीव नसावी. किंबहुना, भूतकाळापासून शिकावयाचा सर्वांत महत्त्वाचा धडा गिरवला जावा. हा धडा असा की, वर्तमानाचा विचार करताना त्यात भूतकाळाचा खोडा अडकविलेला नसावा.

भूतकाळ दिसायला मोठा रम्य भासतो खरा. तथापि, ज़रा काळजीपूर्वक न्याहाळल्यास, वाटला तितका तो रम्य नाही, हे ध्यानात यावयास वेळ लागत नाही. शिवाय ज्या घटकांत एकात्मता आणावयाची त्या घटकापैकी प्रत्येकाचा भूतकाळाचा अनुभव हा वेगवेगळा असणार भूतकाळ म्हणजे भूतकाळाचा संचित अनुभव हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

म्हणून, भारतीय एकात्मता असे म्हटल्याबरोबर वर्णाश्रमधर्माने झळाळणारा भारत असे एका घटकाच्या मनात असून चालणार नाही. कारण इतर घटकांच्या मनात 'वर्णाश्रमधर्माने काळवंडलेला' असा त्याचा अनुभव साचलेला असणार! मग त्याचा संचित अनुभव खरा की त्याचा संचित अनुभव खरा, असा न संपणारा वाद सुरू होईल आणि एकात्मतेचा विचार या वादातच रुतून बसेल. म्हणून एकात्मता भारतीय खरी; पण हा भारत आज–उद्याचा आणि ही भारतीयता आज–उद्याची (साधारण १९८० ते २०३० या पन्नास वर्षांची) अशी खूणगाठ विचार करणाऱ्यांनी मनाशी बांधलेली बरी.

२. भूतकाळाचा विचार करू नये, या विचारातूनच दुसरा विचार स्फुरतो. तो विचार हा की, एकात्मतेच्या या सामूहिक विचारमंथनात भावनेला अज़िबात वाव नसावा. एकात्मतेचा विचार हा जसा समकालीन, तसाच व्यवहार्य आणि टिकाऊ असायला हवा. अर्थात्, त्यात भावना नसावी. कारण, भावना आली की, व्यवहार्यता आणि टिकाऊपणा ही भावनेच्या लोंढयात वाहवलीच म्हणून समजावे.

भूतकाळाची जाणीव जागी झाली की, मनुष्याची स्मरण-रमणीयता (nostalgia) जागी होते. त्या रमणीयतेने माणूस भावनाकुल होतो. त्याचा वास्तवाशी संबंध सुटतो. भूतकाळाची जाणीव विचारात आणायची नाही असे ठरले की, या भावनाकुलतेचा बंदोबस्त होतो.

परंतु वर्तमानकालीन आदर्शवादाची आणखी एक वेगळी भावनाकुलता असते. आंतरभारती वृत्तीत ही भावनाकुलता वारंवार दिसते. निरनिराळ्या घटकांनी एकमेकाचे वारेमाप कौतुक गळे काढून करायचे, हा या भावनाकुलतेचा आविष्कार सर्वपरिचित आहे. या वारेमाप कौतुकात असेल नसेल त्या साऱ्याचेच कौतुक होते व त्यात विवेक वा तारतम्य राहत नाही. शिवाय बहुसंख्यांक घटकांनी अल्पसंख्यांक घटकाचे जरा जास्तच कौतुक करायचे, अशी एक चुकीच्या समतोलाची मागणी हळूहळू जोर धरू लागते आणि ही मागणी तत्परतेने पुरविण्याची अहमहमिका बहुसंख्यांक घटकातील भावनाशील सदस्यांमध्ये सुरू होते.

ही आदर्शानुगामी ओलीचिंब भावनाकुलता कटाक्षाने टाळायला हवी–तिचे दोन मोठे तोटे होतात हे लक्षात घेऊन ही भावना कटाक्षाने टाळायला हवी.

एक तोटा म्हणजे, या भावनाकुलतेने तयार होणारा सार्वत्रिक बावळटपणा. हिंदी सिनेमात हा बावळटपणा असतो. नायक संकटात सापडला की, तो सर्वशक्तिमान परमेश्वराची प्रार्थना करतो. हा परमेश्वर कॅमेऱ्याच्या क्लोजअपमध्ये आधी मस्जिद, मग चर्च आणि शेवटी देऊळ — अशा क्रमाने प्रतीकरूपाने येतो. यात एकात्मता नसते. असतो तो केवळ केविलवाणा एकत्रपणा!

एकात्मतेविषयी व्हावयाच्या विचाराला या केविलवाण्या एकत्रपणाची, त्यातील भोंगळपणाची बाधा अजिबात होता कामा नये. एकात्मतेचा व्यवहार्य टिकाऊ आशय अशा भोंगळपणाने चटकन साधला असा आभास होतो खरा; पण एखाद्या ओरखड्यानेही हा भावुक एकत्रपणा फाटू शकतो. हा भोंगळपणा ही एक भावनातिरेकाची विकृतीच होय. या विकृतीला एकात्मता–चर्चेच्या मंडपाच्या आसपासदेखील फिरकू देता कामा नये.

या विकृतीचा दुसरा आणि तितकाच हानिकारक तोटा म्हणजे, भावनातिरेकाच्या या शिडीने माणसे पुन्हा भूतकाळात चढून जातात नि तेथेच रमतात! फरक इतकाच की, या 'रमणीय' अनुभवात ते एकमेकांच्या भूतकाळाचे अविचाराने वाभाडे काढीत नाहीत; पण तितक्याच अविचाराने एकमेकांच्या भूतकाळाचे अवास्तव व अतिरेकी कौतुक करतात. म्हणजे जो भूतकाळ नको, असे वर कटाक्षाने म्हटले तो भूतकाळ या

वाटेने परत विचारात शिरतोच.

भूतकाळाची वर्तमानात शिरण्याची ही भावनातिरेकी वाट अधिक धोकादायक असते. बुद्ध आणि शंकराचार्य, ख्रिस्त आणि महंमद, शिवाजी आणि औरंगझेब – हे सारखेच वंदनीय होतात. या प्रक्रियेत त्यांना आधुनिक काळाला उचित असा आशय तर प्राप्त होत नाहीच, शिवाय ते आपला मध्ययुगीन, ऐतिहासिक आशयही हरवून बसतात. आपल्या आजच्या भावनातिरेकाच्या कागदी, रंगीबेरंगी पताका एवढेच त्यांचे मोठेपण उरते.

आपल्यालाही मग खरे आधुनिक न होता जुन्यांना मंत्रपुष्पांजली वाहिली म्हणजे पुरे, अशी सोय होते. म्हणजे नावापुरते सर्वधर्मसमभावी, नावापुरते आधुनिक–पण आत मात्र केवळ तात्कालिक सोयवादी, असे आपल्याला छानपैकी राहता येते. हा भोगळपणा, त्यातून निघणारा सामान्यांचा बावळटपणा व असामान्यांचा धूर्तपणा–हे सारे ढोंगी गबाळ या एकात्मता परिषदेत भरता कामा नये.

३. तिसऱ्या विचाराची पायाभरणी दुसऱ्या विचारात झालीच आहे. मध्ययुगीन श्रद्धाळू जुनेपणा टाकून दिल्याशिवाय आजची राष्ट्रीय एकात्मता सिद्ध होणार नाही, हे एकात्मता परिषदेने आवर्जून लक्षात घ्यावयास हवे आणि एकात्मतेची विधायक तत्त्वे व व्यवहार असलेली 'तत्त्वाचारसहिता' संमत करावयास हवी.

यासाठी एक लक्षात घेतले पाहिजे की, सर्वधर्मसमभाव म्हणजे राष्ट्रीय एकात्मता नव्हे. 'आमचे आम्ही किती छान आहोत आणि तुमचे तुम्ही किती छान आहात', असे व्यासपीठावरील महिलामंडळी थाटाचे परस्पर कौतुक (आणि आतून असूया) म्हणजे राष्ट्रीय एकात्मता नव्हे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी राष्ट्रीयतेचा विधायक आशय सर्वांनी लक्षात घेणे आणि मान्य करणे, हे अत्यावश्यक आहे आणि आजच्या काळात, धर्मातीतता, लोकशाही, समाजवाद आणि शास्त्रनिष्ठ, बुद्धिवादी दृष्टिकोन अशा चतुःसूत्रीखेरीज हा आशय वेगळा असू शकत नाही.

राजा राममोहन रॉय यांच्यापासून प्रबोधनाचा जो महाप्रयत्न या देशात उणीपुरी दोनशे वर्षे झाला त्याला आधारभूत तत्त्वे ही या चतु:सूत्रीचीच होती. इंग्रजी राज्याविरुद्ध स्वातंत्र्याची चळवळदेखील या चतुःसूत्रीच्या आधारावरच प्राधान्याने चालली होती. न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, आगरकर, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, बाबासाहेब आंबेडकर, महर्षि कर्वे, पंडित जवाहरलाल नेहरू–इत्यादी नेत्यांचे स्वातंत्र्यलढ्यातील कार्य, कमी–अधिक प्रमाणात प्रबोधनाच्या या चतुःसूत्रीच्या दिशेनेच झाले आहे. किंबहुना भारत इंग्रजी सत्तेविरुद्ध लढू शकला, स्वतंत्र होऊ शकला, याचे श्रेय या चतुःसूत्रीलाच आहे. आधुनिकतेच्या या चतुःस्वरणी महामंत्राने भारत एक राष्ट्र झाला, प्रबळ झाला आणि स्वतंत्र झाला.

दुसऱ्या महायुद्धानंतर यूरोपीय साम्राज्यवादाच्या पकडीतून आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका या तीन खंडातील जी राष्ट्रे स्वतंत्र झाली त्यात आजतागायत फक्त भारतात लोकशाही टिकून आहे. याचे पायाभूत कारण म्हणजे, भारताच्या तळागाळापर्यंत झिरपत गेलेली ही आधुनिकतेची जाणीव होय. गेल्या दहा–पंधरा वर्षांत येथील राजकारण्यांनी, सत्तेच्या अभिलाषेने, या आधुनिकतेला बाजूस सारून प्रतिगामी, एकानुवर्ती गटांची प्रस्थापना करण्याचे पुण्यकार्य सुरू केले आहे. दहा वर्षांत या फळ्या रुंद आणि भक्कम झाल्या. म्हणून आज एकात्मतेसाठी नव्याने प्रयत्न करणे भाग पडत आहे.

यासाठी उद्याच्या परिषदेने या धर्मातीत, लोकशाही, समाजवादी, बुद्धिवादी आधुनिकतेचा स्वीकार भारतीय एकात्मतेचा विधायक आशय म्हणून केला पाहिजे. आधुनिकतेच्या या स्वीकाराचे गमक म्हणून समान सामाजिक कायद्याचे ध्येय मान्य करून या ध्येयासाठी प्रयत्न करावयाचा मनसुबा केला पाहिजे, तरच एकात्मतेचा हा गाडा रेटेल. एरवी फक्त काही चांगले बोलल्याचे श्रेय वक्त्यांना मिळेल आणि तेवढ्यावरच कृतकृत्य वाटेल !

अशी भाषिक धन्यता वाटू नये यासाठी एकात्मता आणू पाहणाऱ्यांनी सावध राहिले पाहिजे. यासाठी त्यांनी दोन पथ्ये कडकपणे पाळायला हवीत.

एक म्हणजे, आपापल्या राजकीय पक्षांच्या अथवा सामाजिक संघटनांच्या कार्यक्रमात आधुनिकतेचा वर सांगितलेला आशय समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न जारी राखला पाहिजे. या देशात कोणत्याही सरकारी वा सार्वजनिक प्रसंगात, कागदपत्रात जातीचा वा धर्माचा उल्लेख कधीही नसावा, यासाठी जनमत तयार करण्याचा प्रत्यक्ष कार्यक्रम त्यांनी हाती घेतला पाहिजे. या कार्यक्रमाची सुरुवात त्यांनी स्वतःपासून करावी. म्हणजे, कोणत्याही प्रसंगी कागदावर आपली जात केवळ 'माणूस' म्हणून लावावी.

दुसरे पथ्य म्हणजे बहुसंख्याक काय वा अल्पसंख्याक काय, आधुनिकतेच्या बाबतीत कोणत्याही गटाचे कसलेही लाड न करणे. आजपर्यंतचा सारा विचका या लाडावलेपणाने झाला आहे. 'धर्मान्तर म्हणजे राष्ट्रान्तर' ही घोषणा बरोबर नाही. एकदम मान्य; पण हे जसे बरोबर नाही, तसेच 'आमच्या धर्मातील सर्व जुन्या समजुती जतन करणे हा मूलभूत हक्क आहे', हेही बरोबर नाही. जुनाट राहण्याचा हक्क मूलभूत नाही, हीच खंबीर भूमिका घेणे आवश्यक आहे. अर्थात्, समान सामाजिक कायद्याला विरोध म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेला विरोध, असे तत्त्व मानले जायला हवे.

साराश, भूतकाळापासून मुक्ती, भावनातिरेकात न गुरफटलेला विचार आणि आधुनिकतेच्या मूल्याचा खंबीर स्वीकार हे तीन आधार पतकरले तरच राष्ट्रीय एकात्मतेला विधायक गतिमानता प्राप्त होईल, एरवी नाही. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अवतीभवती । शरद कृष्णन्

## अध्यक्षपदाचे अवमूल्यन

केरळमधील करूणाकरन सरकार सत्तेवर आले खरे, परंतु आपल्यामागे निर्विवाद बहुमत तयार करण्यास या सरकारला यश मिळू शकले नाही. प्रत्येक सभासदाचा पाठिंबा महत्त्वाचा असल्याने वाटेल त्या तडजोडी मान्य करण्यात आल्या. प्रत्येक सदस्याच्या मताला किंमत असल्याने सदस्यांनीही आपल्याला हव्या असणाऱ्या मागण्या पुढे रेटल्या. के. के. नायर नावाचे अपक्ष सदस्य 'पाठनन थिट्टा' नावाचा नवीन जिल्हा तयार करण्यांत यावा, अशी मागणी घेऊन उभे होते. शासनाने त्यांची ही मागणी मान्य केल्यावरच त्यांनी शासनाच्या बाजूने मतदान केले. याउलट डाव्या आघाडीने ज्यांची नेमणूक केली ते अँग्लो इंडियन सदस्य श्री. स्टिफन पडहुआ काहीशा अनपेक्षितपणे विद्यमान शासनाच्या बाजूने उभे राहिले. प्रत्यक्ष मतदान झाले तेव्हा अनुकूल व प्रतिकूल मतांची संख्या समसमान झाल्याने गृहाचे अध्यक्ष ए. सी. जोस यांनी शासनाच्या बाजूने मतदान करून सरकार वाचवले आणि वारंवार सरकारचाच पाठपुरावा करून आपण अशीच भूमिका राबवणार असल्याचे चांगले सातवेळा मतदान करून स्पष्ट केले. केवळ कायदेशीर तरतुदींचा विचार केला तर घटनेच्या १८९ कलमान्वये गृहाच्या अध्यक्षांना जे अधिकार असतात त्यांची अंमलबजावणी करून श्री. जोस यांनी केरळमधील विद्यमान सरकारला जीवदान प्राप्त करून दिले. सरकार बचावले असले तरी अध्यक्षांच्या मतावर तग धरून असलेले हे सरकार फार काळ तग धरू शकणार नाही आणि केरळमध्ये लवकरच निवडणुकीची रणधुमाळी उडेल, ही दिसती गोष्ट असली तरी गृहाच्या अध्यक्षांनी इतक्या निर्लज्जपणे शासनाचे समर्थन करणे सर्वस्वी अयोग्य आहे. याबाबत श्री जोस यांनी स्वीकारलेली भूमिका कायदेशीर असली तरी संकेतांच्या दृष्टीने विचार केला तर सर्वथैव अयोग्य वाटते. केरळमध्ये गृहाच्या अध्यक्षांच्या मतावर वाचलेले हे पहिलेच सरकार, वादविवादाचे एक नवीन मोहोळ उठवून गेले आहे !

### निःपक्षपातीपणा महत्त्वाचा

संसदीय लोकशाहीमधील सर्वसाधारण संकेताचा विचार केला तरी श्री. जोस यांचा निर्णय हा अभूतपूर्व स्वरूपाचा मानावा लागेल. अध्यक्षीय मतदानाचे जे संकेत पहावयास मिळतात त्यानुसार गृहाच्या अध्यक्षांनी अन्य कोणत्याही गोष्टीपेक्षा अध्यक्षीय खुर्चीच्या निःपक्षपतीपणाला जास्त महत्त्व दिलेले आहे. परंतु हे सारे संकेत गुंडाळून ठेवून केरळ विधानसभेचे अध्यक्ष आपले मौलिक मत घेऊन शासनाच्या बाजूने उभे राहिलेले दिसतात. अध्यक्षांनी मत देण्याबाबतचा सारा इतिहास तपासून पाहिला तर ते 'नाही'च्या गदारोळामध्ये ते पडलेले दिसत नाहीत. अगदी अपरिहार्य परिस्थितीमध्ये स्वतःच्या स्थानाचे पूर्ण भान ठेऊन आणि निःपक्षपातीपणा महत्त्वाचा मानून अध्यक्षांनी यापूर्वी मतदान केलेले दिसते. संसदीय संकेताचे विशेष अभ्यासक सर एरस्किम मे यांच्या मते अध्यक्षांनी आपले निर्णायक मत नोंदवताना सर्व परिस्थितीचा सारासार विचार करून गृहासमोर असलेल्या प्रश्नांचे परिपूर्ण मूल्यमापन करून मगच आपले निर्णायक मत नोंदवावे. अध्यक्षांनी स्वतःचे निर्णायक मत वारंवार वापरून बुडते सरकार वाचवण्याचे अजिबात कारण नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली तर विरोधी मताची कदर अध्यक्षांनी करावी. त्यांच्या स्थानाचा त्यामुळे गौरवच होईल. अध्यक्षीय खुर्चीला मतदानाच्या वावटळीमध्ये ओढूच नये, असे मत काही घटनातज्ज्ञांनी व्यक्त केल्याने फ्रान्स, फिनलंड, इटली यांसारख्या देशांमध्ये गृहाच्या अध्यक्षांना मतदानाचे अधिकार नाहीत. अध्यक्षीय मतदानाबाबतचे भारतीय संसदेमधील दाखले पाहिले तरी सर्वसाधारणपणे अध्यक्षानी मतदान करताना निःपक्षपातीपणाला तडा जाणार नाही, अशी भूमिका स्वीकारल्याचे दिसते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामधील याबाबतचा तपशीलही लक्षवेधी आहे. उत्कृष्ट अध्यक्षीय परंपरा निर्माण करण्यामध्ये कै. विठ्ठलभाई जे. पटेल यांच्या नावाचा उल्लेख करण्यात येतो. अध्यक्षीय खुर्चीची प्रतिष्ठा व गृहामधील कामकाजावांबतची निःपक्षपाती भूमिका याबाबत कै. विठ्ठलभाई विशेष जागरूक असत. आपल्या कारकिर्दीमध्ये अनेक वेळा आपले निर्णायक मत नोंदवले. परंतु शासकीय दडपण अथवा शासकीय अनुग्रह यांचा विचार त्यांनी आपले मत नोंदवताना कधीच केला नाही. अध्यक्षीय खुर्ची अन्य कोणत्याही गोष्टीपेक्षा निःपक्षपातीपणा मागते, असे त्यांचे मत असल्याने शासनाचा अनुनय करण्याच्या भरीस ते पडले नाहीत. भारतीय संसदीय कामकाज पद्धतीबाबत त्यांनी काही आदर्श परंपरा निर्माण केल्या. स्वातंत्र्यपूर्व काळामधील या संसदेला अनेक मर्यादांमध्ये काम करावे लागले असले तरी मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय, एम. आर. जयकर, एस. ए. जिना, मोतीलाल नेहरू, एच. एन. कुंझरू यांसारख्या मातब्बर सदस्यांची उपस्थिती व कामकाजामध्ये भाग घेण्याची पद्धती यातून काही चांगल्या परंपरा निर्माण झाल्या. अध्यक्षीय खुर्चीचा निःपक्षपातीपणा सांभाळण्याबाबत कै. विठ्ठलभाई किती दक्ष असत याचा एक किस्सा नोंदवण्यासारखा आहे. क्रांतिकारी चळवळीचे लोण सर्वत्र पसरले असल्याने व दहशतीचे वातावरण निर्माण झाल्याने तत्कालीन शासनाने सार्वजनिक सुरक्षितता कायदा गृहामध्ये मंजूर करून घेण्याचे ठरवले. कम्युनिस्टांच्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी हा कायदा आवश्यक आहे, असे शासनातर्फे समर्थन करण्यात आले. या विधेयकाला गृहामध्ये जोरदार विरोध झाला. श्री. श्रीनिवास अय्यंगार व अन्य राष्ट्रवादी नेत्यांनी या विधेयकाला जोरदार विरोध केला. २४ सप्टेंबर १९२८ रोजी ज्या वेळी या विधेयकावर मतदान झाले त्या वेळी ६१ अनुकूल व ६१ प्रतिकूल अशी सुस्पष्ट मतविभागणी झाली. शासन बहुमत आपल्या बाजूने उभे करण्यास असमर्थ ठरले आहे आणि अशा परिस्थितीमध्ये माझे निर्णायक मत मी शासनाच्या बाजूने देणे योग्य ठरणार नाही, असे मत नोंदवून गृहाचे अध्यक्ष कै. विठ्ठलभाई जे.

पटेल यांनी विधेयकाच्या विरोधात मत नोंदवले. जैसे थे परिस्थिती कायम रहावी म्हणून कै. विठ्ठलभाई यांनी अनेकवेळा विरोधी बाजूला अनुकूल ठरेल अशा पद्धतीने आपल्या निर्णायक मताचा वापर केला. त्यानी जे संकेत निर्माण केले त्याप्रमाणे १९३५ ते ४५ अशी दहा वर्षे अध्यक्षपद भूषवणारे श्री. अब्दूल रहीम यानी कारभार केला.

ब्रिटिश कालखंडामधील प्रादेशिक गृहांचा विचार केला तरी तत्कालीन अध्यक्षानी उच्चतम परंपरांचा सातत्याने पाठपुरावा केलेला दिसतो. बंगालमधील कौन्सिलचे पहिले भारतीय अध्यक्ष श्री. शामसुदल्ला यानी अध्यक्षीय खुर्चीचा स्वीकार करताना, आपण येथे शासकीय निर्णयांचा पाठपुरावा करणार नाही, तर प्रामुख्याने बिनसरकारी सदस्यानाच आपली सहानुभूती राहील, असे सांगितले. स्वातंत्र्योत्तर काळामध्येही गृहामध्ये अध्यक्षांनी सतत अल्पमतामधील विरोधी पक्षाबाबत सहानुभूतीचे धोरण स्वीकारून व शासनाच्या चुका वेळोवेळी शासनाच्या पदरात घालून निःपक्षपाती धोरणाचा पाठपुरावा केला. गृहाच्या अध्यक्षांनी अन्य बाबी दुय्यम समजून गृहाचे स्वातंत्र्य आणि विरोधी मतांची कदर करण्याची वृत्ती स्वीकारल्याने गृहाच्या कामकाजपद्धतीबाबत, विशेषतः गृहाच्या अध्यक्षांनी कसे कामकाज चालवावे, मतदानामध्ये भाग घेताना कोणता दृष्टिकोण स्वीकारावा याबाबत काही चांगल्या परंपरा निर्माण होऊ शकल्या व अध्यक्षीय खुर्चीची परंपरा सांभाळली जाऊन शासनावर पुरेसा दबाव आला. केरळ विधानसभा अध्यक्षांनी स्वीकारलेल्या भूमिकेमुळे ही उज्ज्वल परंपरा काहीशी काळवंडली आहे यात शंका नाही. गृहाच्या कामकाजाबाबत उत्कृष्ट आदर्श निर्माण करणारे कै. विठ्ठलभाई पटेल यांच्या स्मरणार्थ, नवी दिल्ली येथे त्याचा जो पुतळा उभा करण्यात आला, त्याचे अनावरण करताना कै. पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, 'अध्यक्षीय खुर्ची हा काही केवळ व्यक्तिगत सन्मान नाही. गृहाचे अध्यक्ष संपूर्ण गृहाचे प्रतिनिधित्व करतात. गृहाची प्रतिष्ठा व स्वातंत्र्य जोपासण्याची जबाबदारी अध्यक्षांवर असते आणि गृहामध्ये राष्ट्राचे प्रतिबिंब पहावयास मिळत असल्याने या गृहाचे कामकाज चालवणारे अध्यक्ष एका परीने राष्ट्रीय स्वातंत्र्य व विरोधी मतांची कदर करण्याची वृत्ती यांचे प्रतिबिंब असतात आणि म्हणूनच गृहाने अध्यक्षांची निवड करताना स्वतंत्र बाण्याच्या, निःपक्षपाती वृत्तीच्या चारित्र्यवान नेत्याची निवड या पदासाठी केली पाहिजे.'

देशामधील विधिमंडळाच्या अध्यक्षाची एक परिषद १९६८ मध्ये झाली होती. या परिषदेमध्ये बोलताना श्री. एन् संजीव रेड्डी यानी असे मत नोंदवले होते की, गृहाच्या अध्यक्षानी राजकीय वादविवादापासून कटाक्षाने दूर राहिले पाहिजे, अध्यक्ष, शासनाचा अथवा विशिष्ट गटाचा पुरस्कार करतो आहे,' अशी भावना सदस्यामध्ये कदापी निर्माण होणार नाही, याची दक्षता त्यांनी घेतलीच पाहिजे. या परिषदेनंतर पागे समितीने आपला जो अहवाल प्रसिद्ध केला त्या अहवालातही अध्यक्षाच्या निःपक्षपातीपणावर सगळयात जास्त भर देण्यात आला होता.

संसदीय कामकाजपद्धतीबाबत ज्या आदर्श परंपरा निर्माण झाल्या त्या परपरांना केरळ विधानसभा अध्यक्षानी आपल्या वर्तनाने गालबोट लावले यात शंकाच नाही. सरकार सत्ताभ्रष्ट होऊ नये यासाठी त्यांनी आपले निर्णायक मत सातत्याने राबवले. त्यांनी असे केले नसते तर ? हा अर्थात केवळ चर्चेचा मुद्दा उरला असला तरी तो महत्त्वाचा आहे. त्यानी जर असे केले नसते तर आज सत्तेवर असलेले करुणाकरन सरकार कोसळले असते; पण श्री. जोस यानी भूषवलेल्या अध्यक्षीय खुर्चीची शान वाढली असती. आज विधिमंडळामधून आणि संसदेमध्येही गृहाच्या अध्यक्षावर सत्ताधारी पक्षाची वाढती दडपणे आहेत. अध्यक्षीय खुर्चीवर बसलेला मनुष्य प्रायः सत्ताधारी पक्षाचा असल्यानेच त्याची निवड होत असली तरी एकदा अध्यक्ष म्हणून निवड झाल्यावर तो आपोआपच पक्षीय राजकारणाबाहेर फेकला जातो. तथापि सत्ताधारी पक्ष कित्येक वेळा दडपणांचा वापर करतो व जर अध्यक्ष या दडपणांच्या दबावाखाली निर्णय घेऊ लागले तर अर्थातच विरोधी पक्षामध्ये चीड निर्माण होते. कधीकधी त्याचा उद्रेकही होतो. अध्यक्षावर पक्षपातीपणाचे आरोप करण्यात येतात. केरळमधील विधानसभा अध्यक्षानी निर्णायक मत टाकून सरकार वाचवल्याने त्याच्याविरुद्ध विरोधी पक्षानी रान उठवले, तर सत्ताधारी पक्षाने आपले सारे सामर्थ्य त्यांच्या बाजूने उभे केले. संसदीय कामकाज पद्धतीचा आणि अध्यक्षीय स्थानाचा विचार करता केरळमधील घटनानी एक नवीन अशिष्ट वळण लागले आहे, असेच म्हणावे लागेल.

## □ गुंतवणीमध्ये हजारो ठेवीदारांची होरपळ

आकर्षक व्याजदराच्या जाहिराती फडकावून, ठेवीदारांना मोहित करणाऱ्या अनेक संस्था, कंपन्या आणि व्यक्ती पहावयास मिळतात. लहान ठेवीदार, आपल्या रकमेवर जास्तीत जास्त व्याज मिळावे म्हणून खटपट करत असतो आणि अशा ठेवीदाराला आपल्या जाळ्यात अचूक पकडण्यासाठी काही बोगस संस्था काम करत असतात. अनेक लहान ठेवीदारांची अशा प्रकारे फसवणूक झाली तरी व्याजाचा मोह, नवीन नवीन ठेवीदार अशा संस्थेच्या दाराशी आणून उभे करत असतो. संचयिता इन्व्हेस्टमेंटनामक संस्थेने १९७५ साली आपल्या व्यवसायास प्रारंभ केला. व्यापारी तत्त्वांवर जराही परवडण्यासारखा नसलेला अवाच्यासव्वा व्याजदर देण्यास प्रारंभ केल्याने आणि अर्थात प्रारंभीच्या काळात व्याज वेळच्या वेळी चुकते केल्याने, कंपनीचा पसारा झपाटयाने वाढत गेला. दरसाल दर शेकडा ४८% हा व्याजदर मोह पाडणारा असला तरी तो कोणत्याही आर्थिक तत्त्वावर परवडण्यासारखा नाही, एवढी साधी गोष्ट सुजाण म्हणवणाऱ्या मंडळींच्याही लक्षात येत नाही आणि व्याजाच्या मोहाने ही मंडळी वर्षानुवर्षे कष्ट करून जमा केलेला, निढळ्या घामाचा पैसा या संचयितासारख्या कोणा कंपनीच्या दारात नेऊन ओततात. संचयिताकडून व्याज वेळच्या वेळी मिळत होते, ठेवीही काही प्रमाणात परत केल्या जात होत्या, तोपर्यंत या आर्थिक व्यवहाराबाबत फारशी वाच्यता होत नव्हती. पुढे व्याजाच्या रकमा तुंबू लागल्या, मुदत संपून दोन-दोन वर्षे झाली तरी व्याजाचा पत्ता नाही आणि ठेवी परत करण्याची भाषा नाही, हे पाहिल्यावर प्रकरण तापू लागले पुढे हे संचयिता-प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले आणि आता

सर्वोच्च न्यायालयानेही विविध नावांनी व्यवसाय सुरू करून ठेवीदारांना ठकवणाऱ्या संचयिता या संस्थेच्या संपूर्ण चौकशीचा आदेश दिला आहे. ७५ ते ८१ या कालखंडामध्ये संचयिता या आर्थिक उलाढाली करणाऱ्या संस्थेने कोट्यावधी रुपयांची फसवणूक केल्याचे आढळून आले आहे. संस्थेचे संचालक कोणी मोठे आर्थिक तज्ञ आहेत अशातलाही भाग नाही. एक औषधी दुकानाचा मालक, एक शिंपी व एक छोटे–मोठे आर्थिक व्यवहार करणारा मारवाडी यांनी एकत्र येऊन ही संस्था सुरू केली आणि बघता बघता कोट्यवधी रुपयाचे भांडवल गोळा केले ! कोणताही शास्त्रशुद्ध हिशेब न ठेवता गुंतवणुकी केल्या. सिनेमा–व्यवसायासारख्या व्यवसायात कोटयवधी रुपये घालवले आणि ज्याच्याकडून हे पैसे गोळा करण्यात आले होते त्या ठेवीदाराना पुरते नागवले ! एका संस्थेचे बारा वाजले की, त्या संस्थेचे व्यवहार तसेच ठेवून नवीन संस्था स्थापन करायच्या आणि पुन्हा भांडवल उभे करायचे, असा उपक्रम असल्याने हा खेळ खेळणाऱ्या धूर्त मंडळीना पैशाची कधीच तोशीस भासली नाही. संचयिता या संस्थेची मुख्य कचेरी कलकत्त्यामध्ये होती. संचयिताचे गाडे थंडावल्यावर नवी दिल्ली येथे येऊन याच मंडळीनी राजधानी फायनान्स कार्पोरेशन व संतोषी इन्व्हेस्टमेन्टस या नवीन संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणावर भांडवल उभे करण्यास प्रारंभ केला. माणसे तीच, कचेरी तीच, फक्त पाटी बदलून नव्या व्यवहारास प्रारंभ, असे फसवे धोरण किती काळ चालू शकणार ? यायच्या त्या गोष्टी उजेडात आल्या; पण त्या उजेडात येईपर्यंत लक्षावधी गोरगरीब आपल्या जिंदगीची मिळकत गमावून बसले. सौ. रेणिका रे यांनी आपल्या पतीने मोठ्या कष्टाने जमवलेले ४० हजार रुपये या संचयितामध्ये गुंतवले. एकच वर्ष व्याज मिळाले; पुढे दोन वर्षांनी निदान मुद्दल तरी द्या, असा तगादा त्यांनी लावला. केवळ पैसा मिळू शकला नाही, म्हणून त्यांच्या मुलीचे लग्न मोडले. दुसरे एक ठेवीदार, वसंत जकातदार यानी आपल्या फंडाची सारी रक्कम संचयितामध्ये गुतवली. व्याजाचा एकच हप्ता हाती लागला. पुढे व्याज बंद ! मुद्दल देण्याची भाषाच नाही. त्यांना कॅन्सर झाला म्हणून त्यांनी निदान मुद्दल तरी द्या, असा तगादा लावल्यावर, तुम्हाला कॅन्सर झाला आहे हे सिद्ध करणारा पुरावा सादर करा, असे सांगण्यात आले. त्यांनी डॉक्टरी दाखले वगैरे दिल्यावर मोठ्या मुष्किलीने त्यांना पंचवीस हजारांपैकी आठ हजार रुपये देण्यात आले, रक्कम हाती पडेपर्यंत चिंतेने व्याकूळ झालेले जकातदार कॅन्सरच्या अखेरच्या टप्प्यात होते. त्यांनी पोलिसाकडे तक्रार अर्ज केला आणि पुढे ते मरून गेले ! कापड-गिरणीमध्ये काम करणाऱ्या तामीळनाडूमधील एका बाईंनी त्यांना अपंगत्व आल्याने नोकरी सोडली. त्यांना काम सोडताना तेरा हजार रुपये मिळाले. आपल्या एका नातेवाईकाच्या सल्ल्याने त्यांनी दहा हजार रुपये संचयितामध्ये गुंतवले आणि आता त्या अक्षरश: रस्त्यावर आल्या आहेत ! 'स्टेटसमन' या दैनिकाने याबाबतचा सारा तपशील उजेडात आणला असून या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शासनाने त्वरित कारवाई करावी, असे मत नोंदवले आहे. नागवल्या गेलेल्या ठेवीदाराबद्दल सहानुभूती वाटत असली तरी त्याच्या मूर्खपणाची कीव वाटल्याशिवाय रहात नाही. खेरीज, निदान नवीन ठेवीदारानी या पोळून निघालेल्या ठेवीदारांची उदाहरणे डोळ्यांसमोर ठेवून बोध घ्यावा, असे वाटते. व्याजाच्या मोहात पडण्यापूर्वी निदान मुद्दल सुरक्षित राहील याची शाश्वती असलेल्या ठिकाणी गुतवणूक करावी. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निवाड्यामध्ये चिट फंडाबाबतच्या नियमाचा भंग केल्याबद्दल हे खटले लावण्यात प. बंगाल सरकारने चूक केली, असे नमूद केले असून योग्य कायद्याखाली हे सारे प्रकरण पुन्हा हाताळावे, असे सुचवले आहे. कंपनीच्या आर्थिक व्यवहाराबाबतचे जे कागदपत्र जप्त करण्यात आले आहेत ते आणखी तीन महिने तसेच ठेवून हे सारे प्रकरण पुन्हा नव्याने चालवण्यास राज्यशासनास संधी द्यावी, असे मत नोदवले आहे. लहान ठेवीदारांबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यापलीकडे न्यायालय फारसे काही करू शकलेले नाही. जे कंपनीच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवू शकतात अशा मोक्याच्या जागी असलेल्या अधिकाऱ्यांच्या व पोलीस खात्यामधील महत्त्वाच्या काही व्यक्तीच्या ठेवी परत करण्यात आल्या असल्या तरी ज्याना कोणी त्राता नाही अशा असंख्य छोट्या ठेवीदाराचे पैसे बुडाल्यासारखेच आहेत. संचयिताच्या व्यवहारामध्ये काळा पैसा मोठ्या प्रमाणात वापरला जात आहे, असे निदर्शनास आल्याने त्या दृष्टीने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. संचयिता, संतोषी व राजधानी या तिन्ही फर्म्सचे सचालक एकच असून या कंपन्यानी ठेवीच्या द्वारा गोळा केलेले भांडवल १६० कोटी रुपयाहून अधिक आहे. कंपनीची कोटयवधी रुपयांची ठेव कंपनीच्या संचालकांनी व्यक्तिगत खात्यावर जमा करून घेऊन अतिशय बेजबाबदारपणे व कोणतेही हिशेब न ठेवता वापरल्याचे दिसून आले आहे. सर्व संचालकांची चौकशी सुरू असून त्यांना त्यांच्या कर्माचे काय शासन व्हायचे ते होईल; पण कोणताही दोष नसताना केवळ अधिक व्याजाच्या लोभापायी असंख्य प्रामाणिक छोट्या ठेवीदाराची जी फसवणूक झाली त्याची


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.

–डॉ. य. दि फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०,

भरपाई कशानेही होणार नाही! या ठेवी बुडाल्याने सुमारे सात हजार कुटुंबाचे स्वास्थ्य हरपले आहे, ही बाब विशेष चिंताजनक मानावी लागेल.

## □ रणजी करंडक स्पर्धेमध्ये सुधारणा

देशांतर्गत क्रिकेटचा दर्जा सुधारण्यासाठी प्रथम श्रेणीच्या सामन्यांच्या संख्येमध्ये पुरेशी वाढ झाली पाहिजे, असे मत भारतीय संघाचा कर्णधार सुनील गावसकरने नोंदवले आहे. त्याच्या मते, सातत्याने प्रथम श्रेणीच्या सामन्यात भाग घेणाऱ्या खेळाडूला सध्या वर्षभरात जास्तीत जास्त दहा सामने खळावयास मिळतात. इंग्लंडसारख्या छोट्या देशात क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंना अधिक सामने खेळण्याची संधी मिळते.. स्वाभाविकपणे खेळाचा दर्जा सुधारण्यास त्याची मदत होते. तेथील प्रथम श्रेणीच्या सामन्यात सातत्याने खेळणाऱ्या खेळाडूला साधारणपणे २० ते २२ सामने खेळावयास मिळतात. केवळ सामन्याची संख्या वाढवून दर्जामध्ये सुधारणा होणार नाही. आतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये टिकून रहायचे असेल तर सामने जिकण्यासाठी खेळले गेले पाहिजेत. सामन्यामधील चुरस वाढण्याच्या दृष्टीने गुण देण्याच्या पद्धतीमध्येही काही सुधारणा करता येतील. प्रथम श्रेणीच्या सामन्याचे संयोजन करणारी जी तात्रिक समिती आहे त्या समितीने रणजी करडक सामन्यात गुण देण्याच्या पद्धतीमध्ये काही बदल सुचवले आहेत. या नवीन बदलाप्रमाणे निर्विवाद विजय संपादन करणाऱ्या सघाला १६ गुण देण्यात येतील. पहिल्या डावामधील आधिक्याबद्दल गुण देण्यात येणार नाहीत, तर फलंदाजी व गोलंदाजीमधील गुणवत्तेबद्दल बोनसगुण देण्यात येतील. हे गुण देताना पहिल्या डावात ९० षटकाचा, तर दुसऱ्या डावात ४० षटकाचा विचार करण्यात येईल.

या बदलाबावत सुनील गावसकरसह अनेक खेळाडूनी अनुकूल प्रतिक्रिया व्यक्त केली असल्याने गुण देण्याबाबतचे हे निकष बहुधा लवकरच अमलात आणले जातील. अर्थात गुण देण्याची पद्धती बदलल्याने खेळाडूना खेळाच्या तत्रातही त्या दृष्टीने योग्य ते बदल करावेच लागतील. मोठी धावसंख्या उभी करण्यामागे लागण्याचे कारण उरणार नसल्याने कटाळवाण्या फलंदाजीवर अनेक मर्यादा पडतील. विरोधी सघाला गोलदाजीचे बोनसगुण मिळू नयेत यासाठी प्रयत्नशील रहावे लागणार असल्याने धावाचा वेग व टाकली जाणारी षटके याचा विचार करूनच फलंदाजी करावी लागेल. रणजी करंडक स्पर्धेच्या गुण देण्याच्या पद्धतीमध्ये अंमलात येणाऱ्या या सुधारणाबरोबरच दुलिप करंडकासाठी घेतले जाणारे सामने साखळीपद्धतीने घेतले जावेत, अशी सूचना सुनीलने केली आहे. असे केल्याने प्रथम श्रेणीचे अधिक सामने खेळण्याची सधी खेळाडूना मिळेल. खेरीज, कसोटी सामन्यात प्रवेश मिळावा म्हणून धडपडणाऱ्या खेळाडूंना आपला खेळ दाखवण्याची मोठी संधी उपलब्ध होईल. सामन्याची संख्या वाढल्याने कदाचित परदेश-दौऱ्याच्या वेळी अथवा परदेशी संघ दौऱ्यावर असताना, नेहमी कसोटी सामन्यात खेळणारे खेळाडू या सामन्यात उपलब्ध होऊ शकणार नाहीत; पण तसे झाले तर अनेक तरुण खेळाडूना प्रथम श्रेणीच्या सामन्यात लवकर खेळण्याची संधी उपलब्ध होईल. विद्यापीठीय स्तरावरील खेळाडूना लवकर संधी मिळाली तर कसोटी संघाची निवड करताना निवड समितीला अधिक खेळाडूचा विचार करता येईल. गुणपद्धतीमधील कालसुसंगत बदल व अधिक सामन्यांची उपलब्धता, यामुळे क्रिकेटचा दर्जा सुधारण्यास मदतच होईल, असे निश्चितपणे म्हणता येईल. □


**अभ्यासकास उपयुक्त**
**शेतकऱ्यास प्रेरक**

"श्री. विजय परुळकर यानी शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे चित्र अतिशय जिव्हाळ्याने व जवळिकीने शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या निवेदनाच्या सहजशैलीमुळे 'योद्धा शेतकरी' हे पुस्तक वाचनीय झाले आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीतील एका नव्या पर्वाचे हे शब्दचित्र शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यास प्रेरणा देईल व शेतकरी आंदोलनाच्या अभ्यासकास अतिशय उपयुक्त ठरेल. वार्ताहराच्या तडफेने, अभ्यासकाच्या तिडिकीने व शेतकऱ्यांबद्दलच्या तळमळीने लिहिलेले हे पुस्तक शेतकरी चळवळीच्या वाङ्मयात भर टाकणारे आहे."

–प्रा. एम्. डी. देशपांडे
रविवार सकाळ (कोल्हापूर)
दि. २४ जानेवारी १९८२

**योद्धा शेतकरी**

**ले. : विजय परुळकर**

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
किंमत : रुपये छत्तीस
नेत्यांची व आंदोलनाची छायाचित्रे
पंचरंगी मुखपृष्ठ

'Prisoner without a Name. Cell, without a Number' या जाकोबो टिमरमन यांच्या आत्मकथेचा हा उत्तरार्ध. पूर्वार्ध गेल्या अंकात आलेला आहे. शेवटीशेवटी टिमरमन यांना असे वाटू लागले होते की, ' आपल्याला वेड लागलं तर किती बरं होईल ?' पण या मनःस्थितीतून ते बाहेर पडले आणि त्यांची सुटका झाली तेव्हा त्यांची भावना होती–

**कितीही टोकाचा छळवाद असो अथवा भीरुता असो, त्या गोष्टींवर मात करण्यात मी विजयी होणार आहे आणि सुखसमृद्धी कशी गाठायची हेही आपल्या प्रयत्नाने अर्जेन्टाइन जनता अखेरीस शिकणार आहे....( उत्तरार्ध )**

मराठी अनुवाद : ल. ना. गोखले

हात पाठीमागे बांधलेल्या अवस्थेत त्या स्त्री-डॉक्टरला ब्यूनो आयरिसमधील रुग्णालयाच्या त्या लांबच लांब वाटेवरून फरफटत नेत आहेत. तिला ओढत नेणारा माणूस नागरी पोषाखातला, लठ्ठसा आहे. एका क्षणी तिचे पायही बांधून ठेवतात आणि तिच्यावर ब्लँकेट घातलं आहे. आता ती स्ट्रेचरवर आहे आणि एका लहानशा ट्रकमध्ये तो स्ट्रेचर ठेवला आहे. सुमारे पंधरा सशस्त्र सैनिक तेथे आहेत.

हकीगत कळली ती अशी की, तीन मोटारीमधून ते आले. त्यांची ओळख पटवणारे कोणतेही कागदपत्र त्यांच्याजवळ नव्हते. त्या बाई मनोविकारतज्ज्ञ आहेत. या लोकांनी त्यांची कन्सल्टिंग रूम कोठे आहे याची चौकशी केली. पण ते कोण आहेत ?... ते कोणाचे प्रतिनिधी आहेत ? आणि डॉक्टरबाईंची का चौकशी चालविली आहे, यावद्दल कोणीच त्याना हटकले नाही. बाईंच्या वतीने कोणीही मध्ये पडले नाही. हॉस्पिटलचे अधिकारी–चालकमंडळी, अन्य डॉक्टर, नर्सेस, पेशन्टस या सगळ्यांना ते काय चाललंय हे समजत होतं.

अर्जेन्टिनामधील सेनादलाने सत्ता काबीज केल्यानंतर प्रथम जर कोणाची धरपकड आणि पळवापळवी झाली असेल तर ती मानसशास्त्रज्ञांची आणि मानसोपचार तज्ज्ञांची होय. कारण सेनादलाच्या हेरखात्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्याने अशी मनोमन खूणगाठ बांधली होती की, गनिमी पद्धतीने वा गुप्तपणे चालू असलेल्या दहशतवाद्यांच्या हालचालीसंबंधी सर्वसामान्यांना मुळीच माहीत नसलेल्या किती तरी हकीगती या मानसशास्त्रज्ञ मंडळींना ठाऊक आहेत. दहशतवादी जेव्हा निराशेने ध्येयच्युत होऊ लागतात तेव्हा हे मानसोपचारतज्ज्ञच त्यांची गाडी रुळावरती आणून त्यांच्यातील जहालपणाची तीव्रता वाढवितात. दहशतवादीही माणसचं असतात आणि सतत लपूनछपून राहण्यातून त्यांना काही ना काही मनोविकार जडू पाहतात, तेव्हा ही तज्ज्ञ डॉक्टरमंडळी आपल्या अत्याधुनिक ज्ञानाचा लाभ घडवून देतात. पण अमुक एका मानसोपचारतज्ज्ञाने तमुक एका दहशतवाद्यावर उपचार केले किंवा मनोबळ निर्माण होईल असे काही प्रयोग आजवर केले याबद्दल सेनादलाच्या हेरप्रमुखाजवळ काय पुरावा होता ?

अर्जेन्टाइन सशस्त्र दलाचं जग हे कुलुपबंद मठासारखं आहे. सैनिकांच्या मुली अथवा बहिणी या अधिकाऱ्यांच्या बायका आहेत. आणि अधिकाऱ्यामध्ये घनिष्ट नातेसंबंध आहेत. कोठेही झालं तरी लष्करी राजवटीला सहाय्य करणाऱ्या नागरिकांचे अधिकाऱ्यांशी मुळात खास संबंध असतात. लष्कर सत्तेचा ताबा केव्हा घेतं याकडे हे नागरिक डोळे लावून बसलेले असतात.

या प्रकारामुळे आधुनिक जीवनाच्या बहुविध अंगांपासून सेनादल अलग झालं आहे. शास्त्र, नीतीमत्ता, साक्षरता, धार्मिकता इत्यादीबाबत, अलिकडच्या मानवी इतिहासात स्थिरपद झालेल्या कल्पनांपासून सैनिक केवळ दूर गेलेले आहेत असं नव्हे, तर त्यांच्यामध्ये अनेक विकृत कल्पना पुरत्या बद्धमूल झाल्या आहेत. त्यांना जे कोणत ध्येय गाठायचं आहे, त्यापेक्षाही ज्याचा ते अव्हेर करत असल्याचं दाखवतात, त्याच अंधाऱ्या जगातील कल्पनांना ते सारे सेनादल कवटाळून बसले आहे.

हुकुमशहाना काय पाहिजे असतं ? त्याना जगात काही एक शिस्त उत्पन्न व्हायला हवी असते, ते आखून देतील त्या मार्गानं साऱ्या जगानं जावं, असं त्यांचं म्हणणं असतं. बारकाईनं विचार करणं, कोठे काही विरोध होणं किंवा कसलीही गुतागुंत आढळणं हे त्यांना मुळीच नको असतं. आपलं ध्येय आणि मार्ग यापासून जे निराळे असेल ते त्याना असह्य ठरत. आणि मग लोकशाही पद्धतीचे मार्ग सर्वस्वी खुटतात आणि दंडेली करणाऱ्या हुकुमशहांना अत्याचारानेच उत्तर द्यावं, असं लोकांना वाटू लागतं. साहजिकच सनदशीर राजकारण, विवेचक चर्चा आणि त्यांमधून हळूहळू उत्पन्न होणारे ऐक्य या गोष्टी येथे सुतराम आढळत नाहीत. ज्यांच्यामध्ये सत्ता आणि

अधिकारी ह्या गोष्टी एकवटलेल्या असतात ते अत्यंत निष्ठुरपणे आणि निर्घृणपणे कारभार चालवतात. सत्तेवर राहण्याचा त्यांच्या दृष्टीने तो एकमेव सोपा मार्ग असतो.

'अर्जेन्टाइन फेडरेशन ऑफ सायकॉलॉजिस्टस्' या संस्थेच्या अध्यक्ष-बाईंना त्यांच्या केसांना धरून रुग्णालयाच्या कॉरिडरमधून ओढत नेण्याचं एक कारण असं होतं की, त्या अत्याचारास बळी पडलेल्या नसून जिवंत आहेत, हे लोकांनी पाहावं आणि चार जणांना हे दिसावं की, विरोधकाची अमुक एका पद्धतीनेही ससेहोलपट होते. त्या अत्याचाराचं स्वरूप मध्ययुगीन कार्यपद्धतीचं आहे आणि विरोध हा मुळीच सहन केला जात नाही.

अर्जेन्टाइनच्या लष्करी सरकारने नीतिमत्तेसंबंधीचे अत्यंत कडक नियम लागू केले होते. चित्रपट, नाटक आणि वाङ्मयीन कृती अशा साऱ्या कृतींना, प्रकारांना सेन्सॉरची कात्री मोठ्या दक्षतेने लावली जाई. या नव्या लष्करी अधिसत्तेने विद्यापीठाचे अभ्यासक्रम बदलले. आता समाजशास्त्र, तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र या विषयांचे वरिष्ठ वर्ग आणि उच्च अभ्यास काढून टाकण्यात आले. रुग्णालयातील मानसोपचार विभागामध्ये फ्रॉइडची चिकित्सापद्धती बंद कर-करण्यात आली. दुय्यम शाळांतील विद्यार्थ्यांनी कॅथॉलिक शिक्षणच घेतले पाहिजे, हा आता दंडक झाला. या शिक्षणाचे औपचारिक स्वरूप म्हणूनच की काय, वस्तुस्थितीसंबंधीची जुनाट, प्रतिक्रियावादी पद्धती कार्यान्वित झाली आणि त्यामध्ये सुधारणा करू पाहणाऱ्यांचा निकाल लावणे सुरू झाले. भावी काळातही कोणी 'आधुनिक समाजशास्त्र' रूढ करता उपयोगी नाही, यासाठी त्याचे पुरस्कर्ते हुडकून काढून त्यांची हकालपट्टी झाली. त्यामुळेच प्रत्यक्ष दहशतवाद्याशी संबंध नसलेल्या हजारो लोकांना नाहीसे करण्यावर फार मोठा भर देण्यात आला. हिटलरकालीन जर्मनीतल्या नाझी वेडेपणासही लाजवील आणि रशियातल्या राजकीय गुंडगिरीसही मागे टाकील, अशी कार्यपद्धती सरकारने अंगिकारल्यामुळे १९७५ नंतरच्या काळात अर्जेन्टिनात अत्याचाराचे उद्रेक झाले. ज्यावर कधी कोणी विश्वासही ठेवला नसेल अशा अत्याचारांचा अनुभव लोकांना येऊ लागला आणि हिटलर व स्टॅलिन यांनी त्यासंबंधी केलेले समर्थन जसेच्या तसे अर्जेन्टिनामध्ये होऊ लागले. त्यांनी शत्रू म्हणून ज्यांना संबोधले होते तेच आताचे शत्रू होते. आणि लोककल्याणासंबंधीच्या त्यांच्या ज्या कल्पना होत्या त्याच आता कार्यवाहीत येत होत्या.

**नाझीवादामध्ये ही कार्यपद्धती एकदम उघड होई आणि तेवढी उघड झाली नसली तरी तिचा त्याच धर्तीचा जोष समाजसत्तावादामध्ये प्रकट होई.** परंतु अर्जेन्टिनामधल्या प्रकारांची माहिती बाहेरच्या जगाला तेवढी स्पष्टपणे कळली नाही. त्याला दोन कारणे होती. पहिले असे की, आपला प्रबंध आंतरराष्ट्रीय स्तरावर लागू करण्याची भाषा अर्जेन्टिनाने काढली नाही. दुसरे म्हणजे साऱ्या जगाला लक्ष द्यावे असे अर्जेन्टिनाबाबत कधीच न वाटल्यामुळे त्या सर्व धडामोडी अंतर्गत स्वरूपाच्याच राहिल्या. खरे तर अर्जेन्टिना ही एक विलक्षण अंतर्विरोधाची भूमी आहे. आपण अत्याचारी कार्यपद्धती अमलात आणीत आहोत आणि त्याबद्दलची कारणे अमुक अमुक आहेत, असे सरकारने कधीच मान्य केले नाही. अर्थात तशी अपेक्षा करणेच चूक होते.

आधुनिक मानसोपचारपद्धती सोडून देण्याची आणि मानसशास्त्रज्ञांना नाहीसं करून टाकण्याची अत्यंत अनपेक्षित गोष्ट का घडत आहे, याबद्दलचा शोध घेण्याचा प्रयत्न कित्येक पत्रकारांनी केला; पण कोणालाच निश्चितपणे काही समजू शकले नाही. नुसतेच तर्क आणि अंदाज! वस्तुस्थिती अशी होती की, ही गरज उत्पन्न झाली तरीसुद्धा आपल्या कौटुंबिक अडचणींमध्येही लष्कराचे अधिकारी उपचार म्हणून आधुनिक मानसशास्त्राचा अवलंब करीत नसत. सामान्यपणे ते कॅथॉलिक धर्मगुरूचे साहाय्य घेत. रुग्णास या धर्मगुरूचाच उपदेश ऐकवीत आणि तो अर्थातच 'शान्तपणे भोगा' हे सांगणारा असे...परंतु माहिती काढण्यासाठी किंवा प्रश्न विचारण्यासाठी म्हणून नेलेल्या व्यक्तीबद्दल काहीच समजेनासे झाल्याने समाजशास्त्रज्ञ, पत्रकार आणि विद्यापीठातील विद्यार्थी अशा विविध समाजघटकांमध्ये निव्वळ हाहाःकार उडाला. सर्वसामान्य माणसं एवढी हादरून गेली की, काय घडतंय याबद्दल चकारशब्द काढण्याएवढी कोणी तयार होईना. सगळ्यांना सगळं समजत होतं. निदान राजकीय, धार्मिक पुढाऱ्यांना, वृत्तपत्रांच्या मालकांना, राजकीय पत्रकारिता आचरणाऱ्यांना तरी केंद्रसत्ता काही भयंकर प्रकार करून हजारो लोकांचा निकाल लावीत आहे, हे लक्षात येत होतं. तरीही त्यांची दातखीळ बसली होती; पण यातूनच एक 'युद्धोत्तर' कालखंड उत्पन्न व्हावा—तसा तो सुरू होईलच. युद्धोत्तर जर्मनीत असा एकही जर्मन माणूस निघाला नाही की, जो कॉन्सेन्ट्रेशन कॅम्प्स, गॅस चेम्बर्स आणि क्रेमॅटेरियन ओव्हन्सचं अस्तित्व मान्य करीत आहे. तसंच इथंही घडणार आहे काय?

१९७६ च्या मार्च महिन्यात अर्जेन्टिनात लष्करी राजवट सुरू झाली. लष्कराला हस्तक्षेप करावा लागला त्याची कारणे तशी सरळ होती. सरकार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करीत आहे, प्रचंड प्रमाणात दडपशाही चालू आहे आणि हाच राष्ट्रद्रोह होता, ही ती कारणे होती. लष्करी सत्ताधाऱ्यांना आपले शत्रू स्पष्टपणे दाखविता येत होते आणि लोकांना वाटत होत की, अशा परिस्थितीसाठी म्हणूनच लोकांनी घालून दिलेली पद्धतीच अंमलात येईल! भ्रष्टाचार आणि दंडेली सिद्ध झाल्यानंतर त्याबद्दलचे नियम घटनेत सांगितलेच आहेत; परंतु ज्या लष्कराने देशस्थिती सुधारण्याचा उद्दिष्टाच्याखातर सत्ता काबीज केली त्याने आपले हट्ट, चमत्कारिक पूर्वग्रह आणि वस्तुस्थितीबद्दलचे कुतर्क, किंबहुना देशवासियांच्या भवितव्याबद्दलच्या कल्पना एकदम अशा काही दणक्यात माडावयास सुरुवात केली की, लोक पूर्णपणे हतबल झाले. मानवी मूल्यांची धडधडीत पायमल्ली करणारी ही पद्धती कम्युनिझमने किंवा फॅसिझमने यापूर्वीच सिद्ध केली असेल. आमच्या सत्ताधाऱ्यांना फॅसिझमच अधिकच तर्कसंगत वाटला. बाहेरच्या जगात दुसरे अनेक पर्याय होते; परंतु ते अर्जेन्टाइन संस्कृती, अर्थरचना आणि सामाजिक दर्जाच्या कल्पना यांच्याशी जुळणारे नव्हते. आणि आयातुल्ला खोमेनीनी इराणमध्ये केलेले अत्याचार किंवा युगांडातल्यासारखी मनुष्यहत्या, टोळ्यांमधील संघर्ष यांची युती किंवा मध्य आफ्रिकी देशातल्यासारखी अवस्था अर्जेन्टिनाला लागू करण्यासारखी नव्हती. 'ला ओपिनियन'चा मालक—संपादक म्हणून लष्करी राजवटीच्या कारभारातील तर्कहीनता आणि चमत्कारिकपणा यांचं तत्त्वज्ञानामध्ये करण्यात आलेलं रूपांतर मी

उघड केलं. मला साथ दिली ती ब्यूनो आयरिसच्या 'हेरॉल्ड' या इंग्रजी दैनिकानं. काही प्रादेशिक पत्रेही आमच्या या लढतीमध्ये सामील झाली. या सगळयांच्या लिखाणाचा काही थोडा परिणाम झाला असावा. इंग्रजी दैनिकाबरोबर वाद घालत बसायचं नाही, असं लष्करी राजवटीनं ठरवल्याचं माझ्या स्थानबद्धतेपूर्वी एक वर्ष लक्षात आलं. 'ल ओपिनियन' विरुद्ध मात्र जोरदार कृती करावयाची, असं ठरलं असल्याची बातमी मला कळली होती. एप्रिल १९७७ मध्ये मला स्थानबद्ध करण्यात आलं. 'ल ओपिनियन' वर जप्ती आली. 'हेरॉल्ड'च्या संपादकास दमदाटया करण्यात येऊन डिसेंबर १९७९ मध्ये त्याला अर्जेन्टिनाच्या बाहेर घालविण्यात आलं.

व्यापक परिणामकारतेचा विचार करून जेवढं म्हणून वस्तुनिष्ठ राहता येईल तेवढं राहून सेनादलाच्या धोरणाचा विचार करण्याचं 'ल ओपिनियन' ठरवलं होतं. ते सर्वच वेळी जमलं नाही. कार्ल मार्क्स, चेक व्ह्ग्वारा, सिगमंड फ्रॉइड, किओडोर हरत्झ या साऱ्याचाच लष्करशहा द्वेष करीत होते, हे एक वेळ समजल्यासारखं होतं; पण कम्युनिझमपेक्षाही झायोनिझमचा अधिक जम का होता, हे माझ्या लक्षात येत नसे. रशियापेक्षा इस्रायल अधिक धोकादायक आहे, त्याच्याशी शत्रुत्वच केले पाहिजे, असे लष्करी राजवटीस वाटे.

ख्रिश्चन कुटुंबजीवनाचा दुस्वास करणारा विचार म्हणून फ्रॉइडचं तत्त्वज्ञान अमान्य करण्यात आलं. कुटुंबजीवनाची मध्यवर्ती कल्पना स्त्री-पुरुष संबंधावर आधारणं अयोग्य आहे, असं मानलं गेलं; तो विचार अशास्त्रीय आणि सदोष ठरला हे समजू शकतं; परंतु पॅरेस (पॅरेन्टस) या आई-वडील आणि मुलं यांच्या संबंधाना वाहिलेल्या नियतकालिकाच्या मालक-प्रकाशकास पळवून नेण्यात येऊन छळ करून ठार मारण्यापर्यंत कृती झाली, ती का? या पत्रकाराचं जीवित वाचविण्यात यावं यासाठी माझ्या वृत्तपत्रानं मोहीम उघडली आणि तिचा परिणाम, त्याला देहांताची सजा देऊ नये असे ठरविण्यात झाला; पण त्याच्यावर अट घालण्यात आली की, त्याने आपल्या नियतकालिकाचे प्रकाशन बंद करावे आणि देशत्याग करावा! त्याने मला परदेशातून गुप्त संदेशाने कळविले की, 'तुझ्या मोहिमेमुळे मी वाचलो... पण तू मात्र वाचणार नाहीस!'

प्युस्टो व्हास्कोच्या तुरुंगामध्ये मला विचारण्यात आलेल्या प्रश्नात या पत्रकाराशी असलेल्या माझ्या ओळखीबद्दलही विचारण्यात आलं. दोस्तीमधून वैचारिक समानता, स्वभावातील एकता, समानशीलत्व इत्यादी गोष्टी सिद्ध करण्याचा त्या प्रश्नाचा घाट होता. जर्मनीतील कॉन्सेन्ट्रेशन कॅम्प्समध्ये नाझी अधिकारी असेच प्रश्न विचारीत असत.

☐

आर्म्ड फोर्सेस सुप्रीम कौन्सिलच्या मुख्य कार्यालयात 'खास युद्धमंडळ क्र. २' सुरू करण्यात आलं आहे. त्याच्यापुढे माझ्यावरील खटला चालणार आहे. कायदेकानूनचं आणि नियमाचं मोठ्या काटेकोरपणे पालन होत असल्याचं नाटक लष्करी अधिकारी सादर करीत आहेत. निवाडा मंडळाचे सात सभासद आहेत. त्यात सेनादलाचे तीन प्रतिनिधी, नौदलाचे दोघे आणि हवाई दलाचे दोघे आहेत. सर्वांच्याजवळ माझ्या विधानांच्या नोंदीची प्रत आहे. खटल्याची पार्श्वभूमीही एका पत्रकात दिली आहे. माझी जबानी मला वाचून न दाखविता तिच्यावर माझी सही घेतली असल्याची मी तक्रार करू इच्छितो, असंही एके ठिकाणी नोंदविलं आहे. या सर्व कागदपत्रांचं वाचन केल्यावर आणि पुराव्याची छाननी झाल्यानंतर ते असा निष्कर्ष काढतात की: प्रश्न विचारण्यात आले. कोणत्याही गुन्ह्याचे आरोप ठेवता येत नाहीत. खटला भरण्याइतका पुरावाच नाही!

लष्करी न्यायालयापुढं उभं करण्यापूर्वी कोणत्याच क्षणी मला माझ्या अटकेची कारणं सांगितली नव्हती किंवा काय आरोप आहेत तेही कळलेलं नव्हतं. खटला चालवला पाहिजे असे आरोप कोणते? असलेच तर त्यात दम किती, याचा निकाल कोर्टाने करावयाचा होता. माझ्याविरुद्ध काहीच पुरावा नाही, हे या न्यायमंडळास अगोदरपासून ठाऊक असल्याने त्याची विचारसरणी, तत्त्वज्ञान नि सिद्धांत, हेवेदावे नि लहरी यांचा मारा माझ्यावर प्रश्नांच्या रूपाने करावयाचा, असं त्यांनी ठरवलेलं दिसलं. काही प्रश्न तर अगदीच थातुरमातुर स्वरूपाचे आणि करमणूक करणारे होते.

माझ्या डाव्या बाजूस एक लष्करी अधिकारी आहे. तो फिर्याद दाखल करणाऱ्यांच्या वकील-प्रतिनिधीसारखा आहे. माझ्या उजवीकडील जे अधिकारी आहेत तेही लष्करी अधिकारी आहेत. आरोप ठेवल्यानंतर खटला चालविण्याचं ठरवलं तरच उजवीकडील लष्करी अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करावयाचा, असा त्याचा संकेत ठरलेला दिसतो.

...'हुश्शार'सारखा एक हुकूम दिला जातो आणि आम्ही सगळे उभे राहतो. न्यायमंडळाचे सभासद बाजूच्या दरवाज्याने प्रवेश करतात. ताठ, संथ चालीने ते चालतात. त्या चालण्यात--पावलांत ठामपणा दिसतो. ते सगळे गणवेशात आहेत आणि त्यांच्या डोक्यावर टोप्या आहेत. ते व्यासपीठावर चढतात आणि अध्यक्षांनी बसण्याबद्दलचा हुकूम दिल्यावर खुर्चीवर बसतात. मग आम्हीही सगळे आपापल्या जागी बसतो. त्यांच्या डोक्यांवरच्या टोप्या तशाच असतात. एकंदर दृश्य मोठं रुबाबदार असतं. वातावरणात तणाव भरलेला. आमच्या चेहऱ्यावर गांभीर्याची छटा. आम्ही अगदी शांत!

माझ्यासंबंधीची माहिती न्यायमंडळाचे चिटणीस वाचून दाखवितात नी बरोबर आहे किंवा नाही, हे मला विचारतात. मी होकार देतो. फक्त अध्यक्ष बोलतात. इतर सभासद आपले प्रश्न कागदाच्या लहान चिठ्ठीवर लिहून अध्यक्षाकडे देतात. दोन दिवसांमध्ये मिळून एकूण चौदा तास काम चालते.

सप्टेंबर १९७७ मधील त्या दिवशी आमच्यापैकी किती लोक आरोपीच्या बाकावर बसलेले असतात? किती लोकांच्या कृतीबद्दल निवाडा होतो? जन्मास आल्याबद्दल किती लोकांना न्याय मिळतो? बत्तीस वर्षं व चार महिने एवढा काळ लोटला आणि नाझीवादाविरुद्धची लढाई संपली. नाझी कैद्यांची न्यायालयीन चौकशी झाली आणि त्यांना शिक्षा झाल्या. सेमेटिझमविरोधाची व्याख्या करण्यात आली. त्याविरुद्ध नेमकी उपाययोजना झाली आणि तो बरा करण्यात आला. तरीही बत्तीस वर्षे आणि चार महिन्यानंतर ब्यूनो आयरिस शहरात ज्याच्याबद्दल सर्वस्वी संशयच घेतला जात आहे, असा मी मानवतेच्या विरुद्ध बाजूस जिवंत आहे. जन्मामुळे आणि निव्वळ मूर्खपणाने विश्वासघातासारख्या आरोपाखाली माझी ही चौकशी होत आहे; पण कोण मला न्याय देणार आहे आणि केव्हा? स्पेन,

जर्मनी, फ्रान्स, पोलंड, रशिया अथवा सीरिया यांपैकी कोठे ? आणि यापैकी अनेक ठिकाणी निरनिराळ्या आरोपांखाली एकत्रित अथवा पुन्हापुन्हा भोगावयाच्या शिक्षा मला होणार आहेत आणि केवळ मी ज्यू आहे म्हणून. सगळं मान्य करण्यासारखं मुळीच नाही म्हणून तर हे असह्य आहे !

'तुमचे दहशतवाद्यांशी संबंध आहेत काय ?'

'नाही, अध्यक्षमहाराज !'

'पण तुम्हाला दहशतवादी ठाऊक आहेत ? ठाऊक होते ?'

'अध्यक्षमहाराज, सेनादलानं ज्यांचं दहशतवादी म्हणून वर्गीकरण केलं आहे असे काही लोक अर्जेन्टाइन पार्लमेंटचे सभासद होते. या त्यांच्या कायदेमंडळातील अधिकारामुळं इतर सभासदांबरोबरच मी त्यांच्याशी काही बोलायचो. सेनादलाच्या तिन्ही विभागांच्या प्रमुखांशीही माझा संवाद चालायचा. कोणाही वृत्तपत्र-मालकाकडून होणारा हा सर्वसामान्य व्यवहार होय.'

'टिमरमन, प्रश्नांची उत्तरं द्या.'

'मी खिसे कापून चोरली नाहीत अशा पाकिटांची संख्या जास्त आहे, असं सांगणाऱ्या एका पाकिटमाराची आठवण मला तुमच्या बोलण्यानं होत आहे दहशतवाद्यांचा आणि तुमचा संबंध याबाबत होय किंवा नाही एवढंच सांगा !'

'संबंध नाही, अध्यक्षमहाराज !'

'तरीही तुमच्या वृत्तपत्रात प्रमुख दहशवाद्यांची निवेदने प्रसिद्ध होत होती. ती तुमच्या हाती कशी लागली ?'

'अध्यक्षमहाराज, मी बेकायदेशीर स्वरूपाची, संशयास्पद वाटणाऱ्या व्यक्तीची निवेदने छापली नाहीत. जो माणूस पत्रकाराला बोलावून मुलाखत देतो, ज्याला पोलिसानी अथवा सैनिकांनी अटक केली नाही आणि ज्याची पत्रकं सरकारी टेलिव्हिजनवरून प्रक्षेपित केली जातात अशा एखाद्या माणसास मी दहशतवादी का संबोधायचं ? आपण निर्देशिता ती पत्रकं सर्वच दैनिकांनी छापली आणि त्यांच्या मालकांना काही या युद्धमंडळापुढं खेचलेलं नाही.'

'पण त्या दहशतवाद्यांपैकी एकास अटक झाली तेव्हा त्याची बाजू मांडण्यासाठी म्हणून तुम्ही उघडपणानं पुढं आलात.'

'हो. त्याला जर कायदेशीर कारवाईची संधी देण्यात आली असती तर मी अशा प्रकारे त्या प्रकरणात भाग घेतला नसता; पण त्याला कायद्याचं काहीच संरक्षण लाभलं नाही. तेव्हा मला वाटलं, देशाची न्यायरचना धोक्यात आहे.'

'आणि त्याच वेळी तुम्ही त्या दहशतवाद्यांवर एक कृपा करीत होता......'

'दहशतवाद्यावर नाही, देशावर, अध्यक्षमहाराज ! मला हे सांगावंसं वाटतं की, मी असा एकटाच वृत्तपत्रवाला होतो की ज्यानं दहशतवाद्याविरुद्ध सतत लिहिलं आणि–'

'काही लोक असं म्हणतात की, तुमच्या खऱ्या हालचाली लपविण्यासाठी तुम्ही ते मुद्दाम केलं.'

'हे बालिश विधान आहे, अध्यक्षमहाराज !'

'तुम्ही इथं प्रश्नांची उत्तरं देत आहात, मतं सांगण्यासाठी तुम्हास बोलावलेलं नाही.'

¤

एखाद्या ऐतिहासिक क्षणी, विशिष्ट अशा भौगोलिक ठिकाणी एकंदर लोकव्यवहाराच्याविरुद्ध काही प्रवृत्ती उत्पन्न होतात. माहितगार, सुशिक्षित, व्यवसायप्रेमी आणि कार्यक्षम असलेल्या पत्रकारानं अशा वेळी डाव्या अथवा उजव्या गटाच्या दहशतवाद्यांपैकी कोणाचीही बाजू न घेता, दोघांच्याही विरुद्ध असणारी भूमिका आपण घेऊ शकू आणि ती लोकशाहीवादीच असेल असं का मानाव ?

अर्जेन्टिनामध्ये लढ्यात सहभागी नसलेला प्रत्येक माणूस केवळ जिवंत राहण्याच्या खटपटीत होता. तीच अवस्था वृत्तपत्राची होती; पण अशा प्रकारे जिवंत राहण्याच्या खटपटीत न गुंतलेल्यांनी आपल्याविषयी संशय उत्पन्न का होऊ द्यावा ? मी हेबियस कॉर्पससाठी होणारी आवाहनं छापली नाहीत तर लष्करी सरकारशी, लष्करी हुकमतीशी माझा काही तंटा होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असं मला अर्जेन्टिनाच्या अंतर्गत खात्याच्या एका मंत्र्यानं सांगितलं होतं. ब्यूनो आयरिसमधील एक 'हेराल्ड'चा अपवाद वगळला तर इतर सर्व वृत्तपत्रानी ती आवाहनं छापणं केव्हाच बंद केलं होतं; पण तो दिसायला सोपा असणारा निर्णय करणं अशक्यप्राय होतं; ते करायला पाहिजे होतं; पण ते खरंच अशक्यप्राय होतं. हेबियस कॉर्पस—आवाहनं छापून कोणाचे मुलगे, पती, पत्नी, भाऊ न्यायालयापुढं हजर होत नव्हते; परतु 'ल ओपिनियन'मध्ये ती प्रसिद्ध होणं, छायाचित्राच्या प्रसिद्धीमुळं काही व्यक्तीचे चेहरे दिसणं यातच वृत्तपत्र ही एक शक्तिशाली संस्था आहे, असं वाचकाला वाटत असतं, अशी माझी मनोमन कल्पना होती. तसं नाही करायचं तर मग लोकांना तुम्ही सारं काही विसरून जा, खुशाल मरा, ज्यासाठी प्रार्थना करीत आहात ते काहीही साध्य होण्यासारखं नाही, असं का एखाद्या संपादकानं म्हणायचं ? धर्मात जे सांगितलं ते लोक करीत होते आणि शांत रहा, असं राजकारणी लोक त्यांना सांगत होते.

राजकारणी मंडळी सांगत होती त्याप्रमाणे 'शांत रहा, गप्प रहा, अगदी मुकं बना' असं का लोकांना नुसतं सांगत बसायचं ? का पोलीस म्हणत असत त्याप्रमाणे 'सत्ताधाऱ्याच्याविरुद्ध ब्र काढाल, त्यांची लांडीलबाडी उघड करू पहाल तर फासावर लटकाल !' असं म्हणायचं ? का इतर काही वृत्तपत्रं करतात त्याप्रमाणं कोणी वाचक भेटायला आला तर त्याच्याशी काही बोलायचंही नाही ? करायचं तरी काय ? वृत्तपत्राचं अस्तित्व कशासाठी असतं ? त्याचा जीवितहेतू तरी कोणता......या सगळ्या प्रश्नांचा विचार सतत केल्यानंतर मी एकच उत्तर मनाशी ठरवलं होतं, ते असं की——लोकांची गाऱ्हाणी, तक्रारी, पळवापळवीच्या आणि दहशतीच्या हकीगती——त्यासंबंधीचा मजकूर स्वीकारायचा, त्यातलं जे छापता येईल ते छापायचं. नाहीशी झालेली काही माणसंही परत आलेली आहेत; घाबरू नका, धीर धरा, आपल्या प्रिय व्यक्तीच्या शोधात रहा, छापण्यासारखं काही कळलं तर आम्हाला कळवा, असं सर्व संबं-

**वृत्तपत्रांचं अस्तित्व कशासाठी असतं ? त्यांचा जीवनहेतू तरी कोणता ?**

धितांना सांगत रहायचं. असं जर काही करता येत नसलं तर आपलं वृत्तपत्र बंदच करून टाकायचं !

एक गोष्ट सर्वस्वी अशक्य आहे, असं माझ्या लक्षात आलं आणि ती म्हणजे वृत्तपत्र बंद करून टाकणं !

मी माझ्या सहकाऱ्यांशी अनेकदा चर्चा केली आणि काही काळापुरतं पत्र बंद ठेवण्याचा विचार केला. दुसरा एक विचार असाही केला की, कुटुंबियांसह मी काही दिवस देशांतर करावं आणि माझ्या अनुपस्थितीत सहकाऱ्यांनी हलके हलके चालू जमान्याशी जुळवून घेणारं रूप ' ल ओपिनियन 'ला द्यावं. या कल्पना साध्या, सरळ आणि सहजपणे अंमलात आणण्याजोग्या होत्या. गृहमंत्र्यांसमवेत कॉफी घेण्यासाठी म्हणून गप्पा मारीत बसायचं, धोक्याचा मुळीसुद्धा विचार करायचा नाही, वृत्तपत्र बंद ठेवण्याबद्दल घट्ट मनानं त्यांना सांगायचं आणि लोकांच्या हालअपेष्टा, सत्ताधाऱ्यांकडून होणारा जुलूम या साऱ्या कल्पना मनातसुद्धा आणायच्या नाहीत. त्याचा काही म्हणून आपल्यावर परिणामच होत नाही, असं प्रयत्नपूर्वक दाखवीत राहायचं. मी परदेशी निघून जाऊन, जुळवून घेणाऱ्या सहकाऱ्याच्या कल्पनेला आम्ही गंमतीनं नावं दिली होती, ' नॅचरलायझेशन ' व ' नॉर्मलाझेशन. ' म्हणजे घडतंय त्याच्याशी सुसंगत राहायचं, कारण तसं राहिलं नाही तर आपल्या वृत्तपत्रावर ज्यांचं पोट अवलंबून आहे त्याची आणि त्याच्या कुटुंबियाची अवस्था फार विलक्षण होईल. या विचारामागं, सरकारशी चालू असलेल्या झगडयात अन्याय झालेल्यांचा, वंचितांचा पक्ष कधी म्हणून जिंकू शकणारच नाही, अशी भावना होती. तत्त्वासाठी झगडणं ही निव्वळ कविकल्पना ठरत असते, हा विचार या साऱ्या निराशेच्या मुळाशी होता. तेव्हा सुचलेल्या विविध पर्यायांपैकी अगदी सोप्या, साध्या मार्गाचा अवलंब मी केला असता तर माझी अटक आणि नंतरच्या यमयातना येथपर्यंत एकूण प्रकरण आलंच नसतं.

माझ्या मनातील शंका, भीती आणि प्रचंड खळबळ लष्करी न्यायमंडळास कशी काय समजणार, हा माझ्यापुढील आताचा प्रश्न होता. एखादं लष्करी न्यायमंडळ किंवा कोणतंही लष्करी सरकार, मानवी स्वतंत्रतेच्या भावना नि जनसामान्यांच्या निर्धाराची अपरिहार्यता समजावून घेतात काय ? जगात असं कधी झालंय काय ? एखादा ज्यू आपल्या आर्थिक सुबत्तेचा त्याग करून, आपल्या मनःशांतिवर निखारा ठेवून निव्वळ कोण्या उच्च कल्पनेसाठी अथवा सच्च्या माहितीच्या प्रसिद्धीसाठी ठामपणे समोर उभा राहू शकेल असं १९७६–७७ चं अर्जेन्टाइनमधील लष्करी सरकार कसं मान्य करणार ? कोणी जन्मतःच ज्यू असणं म्हणजे काही अनैसर्गिक होणं अजी तर त्या सरकारची पुरेपूर धारणा आहे. साहजिकच एखाद्या ज्यू व्यक्तीचा सरकारविरोधी निर्धार म्हणजे अतिभयंकर पाप होय. पूर्णपणे निपटून काढण्याची ती गोष्ट होय. लोकजीवनासंबंधीचा ' ल ओपिनियन 'चा तर्कयुक्त, विवेचक आणि क्रांतिकारी दृष्टिकोन आणि अलीकडच्या काळातील अर्जेन्टाइनमधील वस्तुस्थिती यांचं नेमकं नातं काय होतं ? पत्रकारितेचा हेतु, पूर्वसूरीनी घालून दिलेले संकेत, पत्राच्या संचालनातील आजवरचा अनुभव, वाचकांना, लोकांना झालेला त्यांचा उपयोग, पत्रासंबंधीच्या त्यांच्या अपेक्षा, पत्र आणि वाचक यांच्यात सर्वस्वी मतैक्याच्या असणाऱ्या गोष्टी इत्यादी किती तरी विषयांचं रसायन माझ्या मनात खखखदत होतं. लोकशाही, स्वातंत्र्य, सहजीवन या विषयांच्या बाबतीत डाव्या आणि उजव्या विचारांची मंडळी एखाद्या मुद्द्याच्या अनुषंगानं एकत्र येतातही. ' ल ओपिनियन ' काही सरसकटपणे आत्मघातक मजकूर लिहीत नव्हता किंवा उघड उघड दिसणाऱ्या मृत्यूशी भिडू पाहात नव्हता. किती तरी सरकारी आज्ञाची माझं हे वृत्तपत्र अंमलबजावणी करीतच होतं. ——— आणि तरीही ' झाओनिस्ट ' असल्याबद्दल डाव्या विचाराची मंडळी 'ल ओपिनियन'ला विरोधी मानत होती. दहशतवादी असल्याबद्दल लष्करी सरकार त्याला विरोधी मानत होतं. उच्च लेखकांचं ध्येयवादी साहित्य ' ल ओपिनियन 'मध्ये प्रसिद्ध होत असल्यानं सर्वसामान्य लोकसंस्कृतीच्याविरुद्ध ते पत्र मानलं जात होतं आणि काही डावे लोकही ' ल ओपिनियन 'च्या स्तंभाचा उपयोग करीत असत, म्हणून ते ख्रिश्चन नीतितत्त्वांच्या विरोधी समजलं जात होतं. रशियातून फुटून निघून बाहेर पडणाऱ्यांची माहिती त्यात येत असल्यानं डाव्या विचारांच्या मंडळीच्याविरुद्ध ते मानलं जाई. आणि एकदा या पत्राच्या शास्त्रविभागात तरुण अमेरिकनांच्या लैंगिक सवयीसंबंधी एक लेख प्रसिद्ध झाल्यापासून, कुटुंब–जीवनाच्या ते विरोधी बनलं होतं ! असं ते अनेकांच्या दृष्टीनी त्यांच्या त्यांच्याबाबत 'नको असलेलं ' वृत्तपत्र ठरत होतं. क्यूबाशी संबंध तोडू नयेत, तोडल्यास अर्जेन्टिनाच्या आतरराष्ट्रीय धोरणावर अनिष्ट परिणाम होईल, असं मत 'ल ओपिनियन' मांडत असल्यामुळं हे पत्र दहशतवादी असल्याचं समजलं गेलं. खरं तर बाहेरील देशातून येणाऱ्या दहशतवाद्यांना आश्रय देण्यावरून आणि क्रांतीची निर्यात बाह्य देशात करण्यावरून ' ल ओपिनियन ' क्यूबाची खरडही काढीत असे.

हस्तक्षेप करून सद्यःस्थितीमधील क्रम बदलला पाहिजे, असं ' ल ओपिनियन 'चं मत होतं आणि जीवनाच्या विविध स्तरांवर हस्तक्षेप करण्याची या पत्राची पद्धती मोठी धोक्याची होती. कारण अत्यंत गोपनीय स्वरूपाच्या गोष्टीमध्येही डोकवावं लागे. विशिष्ट माहिती देण्यात ' ल ओपिनियन 'चा काय हेतू आहे, हे संबंधित दोन्ही पक्षांना कित्येकदा समजत नसे आणि हेतू काहीच नाही, हे मान्य करणंही अत्यंत अवघड होतं. ज्यू म्हणून शिक्का मारलेल्या एका पत्रकास अत्यंत बेजबाबदार, मूर्खपणे वागणाऱ्या सरकाराशी पुढील प्रश्न दिसत असूनही ज्यू जमातीसाठीच आणि झाओनिस्ट नेत्यांच्या वतीनं लढा द्यावयाचा होता.

सर्वांच्याच डोळ्यात काही तरी अगम्य दिसत होतं. वातावरण संशयास्पद बनलं होतं. स्पष्टीकरण मिळण्याची आवश्यकता होती. विरोधकांचे हालहाल होण्याचा त्या परिस्थितीत ' ओपिनियन'मधील काही थोडी माणसं, 'हेराल्ड'मधील काही मोजके पत्रकार आणि मानवी हक्कासंबंधीची जागतिक संस्था यांच्याकडून काहीही मतप्रदर्शन होणार नाही, असं सत्ताधाऱ्यांना वाटत होतं की काय कोण जाणे ! काही ख्रिश्चन धर्मगुरू मनातून घाबरलेले असतानाही या लोकांसाठी काही करावं, तुरुंगातील त्यांची हालहवाल पाहावी आणि हरवलेल्या लोकांचा शोध घ्यावा, याबाबत प्रतिसाद देत होते, हेच मोठं आश्चर्य होतं. त्यांच्यातील कोणी परागंदा झालेल्यांच्या कुटुंबाला गुप्तपणे आधार देत, वृत्तपत्रामधून मोठ्या खुबीदारपणे मजकूर प्रसिद्ध करीत. वृत्तपत्र बंद होण्याची भीती असतानाही ते घडे हे विशेष होय. सत्ता-

धाऱ्यांचं हे टोकाचं वर्तन, वृत्तपत्रस्वातंत्र्याची आणि लोकशाही-संबंधीची आमची स्वप्नं आणि भीती, दहशत इत्यादीच्या घबराटीच्या वातावरणात आमच्या या स्वप्नाना वाट देण्यासाठी कोणी कोणी पुढं येणं या सगळ्याच गोष्टी कशा होत होत्या? लष्करी न्यायमंडळा-पुढं उभं असताना माझ्या मनात हे विचार दाटून येत होते. ज्या कर्नल क्लोडोव्हिओ बॅटेस्टी यांची खास युद्धमंडळ क्र. २ चे अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली होती त्यांनाच सरकारी टेलिव्हिजनच्या—की जेथे बिनोद, सभ्यता, सौंदर्य, बुद्धिमत्ता आणि सहजता इत्यादींनी युक्त असणारं जीवन असंख्य लोकांपुढे रोज उलगडलं जायचं होतं.

¤

या क्रमांक दोनच्या खास युद्धमंडळाने माझ्यावर जाकाबो टिमर-मनवर–कोणताही आरोप लागू करता येत नाही, म्हणून त्यास त्यांच्या कार्यकक्षेबाहेर आणले जावे, अटकेत ठेवण्याजोगे कोणतेही कारण नाही, असा निवाडा दिला. १९७७ च्या सप्टेंबर महिन्याच्या अखे-रीस हे घडले आणि मला १३ ऑक्टोबरला कळविण्यात आले.

प्रश्न विचारणं, जबानी घेणं, हे सारं काही थांबलं. परंतु सेना-दलाच्या सरकारानं मला माझ्या घरात पुढील दोन वर्षं स्थानबद्ध केलं. २४ सप्टेंबर १९७९ ला सर्वोच्च न्यायालयानं माझी ही अटक अनावश्यक ठरविली. ज्याकोबो टिमरमन ख्रिस्तविरोधी आहे, हे सिद्ध करणं अशक्य असलं तरीही सेनाधिकाऱ्यानी ते कारण पुढं केलं होतं. आणि आता सर्वोच्च न्यायालयानं ते अमान्य केलं होतं, हे कसं काय घडलं? मला समजलं ते असं होतं : गृहमंत्र्यानी सागि-तलं की, टिमरमन दहशतवादी आहे, पण त्यांच्या दुर्दैवानं त्यांना ते सिद्ध करता येणारं नव्हतं. टिमरमनला लष्करी कोठडीतच ठेवावं आणि सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचा राजीनामा स्वीकारावा, असं लष्करप्रमुखांनी सुचवलं होतं. पण टिमरमनच्या सुटकेबाबतचा सर्वोच्च न्यायालयाचा हुकूम मानला नाही तर आपण राजीनामा देऊ, असं ज्योर्ज रॅफेल व्हिडेला यानी आंतरराष्ट्रीय दडपण वाढल्यानंतर प्रकट केलं तेव्हा कोठे लष्करी नेते सालोमनसारखी उपाययोजना घेऊन (सालोमन हा ज्यू राजा होता हे त्याना माहीत नसलं पाहिजे.) पुढे आले. त्यांनी टिमरमनचं अर्जेन्टाइन नागरिकत्व रद्द केलं, त्याला देशत्याग करावयास लावला. त्याच्या सर्व मालमत्तेवर जप्ती आणली. सर्वोच्च न्यायालयाने सुटकेचा आदेश दुसऱ्यांदा दिला होता तरीही!

—आणि जर्मनांनी जसे कॉन्सेन्ट्रेशन कॅंपबाबत कानावर हात ठेवले त्याप्रमाणे आम्हाला यातलं काहीच माहीत नाही, असं म्हणत अर्जे-न्टाइन वृत्तपत्रांनी, कायदेपंडितानी, सरकारच्या राजकीय मित्रानी, ज्यू जातीच्या नेत्यानी सर्वोच्च न्यायालयाच्या आज्ञा पाळल्याबद्दल सरकारचं अभिनंदनच केलं. हे सारं अपेक्षेप्रमाणचं घडलं!

¤

१९७३ ते १९७६ मध्ये सत्ताधारी असणाऱ्या चारही पेरोनिस्ट अध्यक्षाच्या कारकिर्दीत माझ्या वृत्तपत्रास जो त्रास झाला तसा तो कोणालाच झाला नाही. पेरोनिझमच्या डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही गटांनी मला छळलं. सर्व प्रकारच्या दहशतवादाला माझा विरोध आहे, हे लष्करी सत्ताधाऱ्यांना कसं पटवून द्यायचं हेच अवघड होतं; पण ते पटवून देणं आवश्यक होतं आणि अर्जेन्टाइन कायद्याच्या चौकटीत ते करायला हवं होतं.

व्यक्तिशः लोकशाहीवादी विचाराचे असणाऱ्या आणि अत्यंत बुद्धिमान मानल्या गेलेल्या काही लष्करी अधिकाऱ्यांना पंधरा वर्षां-पूर्वी मी पाठिंबा दिला होता आणि त्यावरूनच लष्करी अधिकाऱ्यात माझ्यावरून टीका झाली होती आणि विशिष्ट अधिकाऱ्यांना पाठिंबा देऊन 'टिमरमन सैन्यात फूट पाडीत आहेत', असा प्रचार झाला होता.

१९७७ मध्ये मी एका बातमीदारास एका वरिष्ठ सेनाधिकाऱ्या-संबंधी लेख लिहिण्याच्या उद्देशाने पाठविलं होतं. माझ्या पत्रानं त्याची स्तुती होण्याचा त्या अधिकाऱ्यानं एवढा धसका घेतला होता की, त्याच्यासंबंधी विशेष असं काही छापलं जाऊ नये, असं मला त्याने प्रथम तारेने कळविले. लष्करातील काही जणांचं म्हणणं असं होतं की, मी धार्मिक प्रवृत्तीचा झाओनिस्टच आहे. पण त्यांना जेव्हा मी सांगितलं की, 'मी ज्यू आहे तो राजकारणातल्या मुशीतला; म्हणजे मी मुळी राजकीय झाओनिस्टच आहे.' पण हा प्रकार त्यांना अज्ञात असावा. कारण त्यानी मुळी माझी धास्तीच घेतली!

¤

मला माझ्या घरामध्ये नेण्यात येणार आहे आणि तेथेच स्थान-बद्ध करण्यात येणार आहे, अशा अफवा वर्तमानपत्रांनी प्रसिद्ध केल्या. तेव्हा ब्यूनो आयरिसमधील इस्त्रायली वकिलातीला वाटलं की, त्या अफवांमुळं सैन्यामधील कडव्या जमातीचा गट मला माझं घरसुद्धा पाडू देणार नाही. त्यांनी माझ्या बायकोला सांगितलं की, घराकडे माझी बदली होईल तेव्हा—आणि ती गोष्ट अत्यंत गुप्त राखली पाहिजे. मी हृदयविकाराने आजारी पडल्याचा किंवा तशा तऱ्हेचं काही तरी विलक्षण होत असल्याचा बहाणा करायचा आणि एखाद्या प्रख्यात डॉक्टरला तपासण्यासाठी विनंती करावयाची. तसं काही घडलं तर या वकिलातीला माझ्या बायकोच्या ताब्यात एखादी अॅम्ब्युलन्स देता येईल आणि त्या सगळ्या प्रकारातून माझ्याशी संपर्क साधता येईल.

माझ्यासंबंधी ब्यूनो आयरिसमधील वृत्तपत्रं हकिगती देऊ लागली तेव्हा माझ्या स्थानबद्धतेला तीस महिने पुरे झाले होते. कोठलाही गंभीर आरोप सिद्ध झाला नसल्यानं माझ्या सुटकेचा आदेश सर्वोच्च न्यायालयानंच सरकारला द्यायला हवा होता. माझ्याविरुद्ध कसलेही आरोप नाहीत आणि मी मुक्त आहे, असा निवाडा लष्करी न्याया-लयानं सप्टेंबर १९७७ मध्ये दिला असला तरी माझी घरातली स्थानबद्धता चालूच होती. तशातच एक चमत्कारिक घटना घडली. ब्यूनो आयरिसमधील ज्यू लोकाच्या कायदेशीर सल्लागाराने सुप्रीम कोर्टाची आज्ञा झुगारली गेली नसल्यामुळं माझी घरातील स्थानबद्धता कायदेशीरच आहे, असं म्हटलं. सर्वोच्च न्यायालयानं मला राष्ट्रपतीच्या अखत्यारीत बंधमुक्त केलं असलं तरी लष्करी सत्तामंडळाच्या तावडी-तून माझी सुटका केलेली नव्हती.

अखेरीस सप्टेंबर १९७९मध्ये पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयात माझं प्रकरण निघालं व माझी सुटका होईल असं मानलं गेलं. आता रीतीप्रमाणे या प्रकरणात माझ्या वकिलाला अगर बायकोला कळवा-वयास हवं होतं, पण सर्वोच्च न्यायालयाचा निकाल फक्त सरकारला कळविण्यात आला आणि त्याने तो गुप्त ठेवला. लष्करप्रमुखाची एक खास बैठक भरली आणि न्यायालय जरी सोडत असलं तरी त्या हुकुमाची अंमलबजावणी करायची नाही, असं ठरलं. या प्रकारामुळं सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशानी राजीनाम्याची धमकी दिली तेव्हा न्यायाधिशांना अटक करावी, असे लष्कर प्रमुख म्हणत होते.

परंतु राष्ट्राध्यक्ष असलेल्या जनरल व्हिडेलो यांनी जाहीर केलं की, 'जर सरन्यायाधीशच राजीनामा देत असतील तर माझाही राजीनामा'...या वेळी माझी बायको वॉशिंग्टनमध्ये होती आणि अर्जेन्टाइन सरकारवर प्रभावी दडपण कसं आणायचं यासंबंधीच्या विचारात असलेल्या अमेरिकन कांग्रेस सदस्यांना ती सल्लामसलत देत होती. व्हॅटिकनच्या पोपचीही खटपट चाललीच होती आणि त्याच वेळी माझी स्थानबद्धतेतील अखेरची बदली झाली.

¤

मंगळवार होता. ब्यूनो आयरिसच्या वृत्तपत्रांनी बातमी छापली की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार माझी सुटका करण्यावरून वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांत मतभेद झाले आहेत. बुधवारी होणाऱ्या लष्करी सत्ताधाऱ्यांच्या बैठकीत वरिष्ठ लष्करी अधिकारी माझ्या प्रकरणाची पुन्हा तपासणी करतील, असंही या बातमीत नमूद केलं होतं.

मंगळवारची दुपार : मानवी हक्कासंबंधीच्या कायमच्या मंडळाचे सभासद रॅबी रोबर्टो ग्राऐरझ् मला भेटतात. ब्यूनो आयरिसमध्ये त्यांच्या खुनाचे दोनदा प्रयत्न झाल्यामुळे ते रिओ-डी-जानेरो येथे राहात असतात. माझ्या घराभोवती असणाऱ्या पोलिसांची संख्या खूप वाढली असल्याचं त्याना जाणवतं. त्याच्या बायकोने माझ्यासाठी केक पाठविलेला असतो. माझी फक्त पाच मिनिटं भेट घेण्यास त्यांना अनुज्ञा मिळते आणि खरोखरीच सहाव्या मिनिटाला ते निघून जातात.

एका तासानंतर एक वरिष्ठ पोलीस अधिकारी माझ्याकडे येतात. मी त्याना पूर्वी कधीच पाहिलेलं नसतं. माझं घर ज्या भागात आहे त्या भागाचे पोलीस प्रमुख त्यांच्याबरोबर असतात. मी कुठं तरी जायचं आहे आणि कशावर तरी सह्या करायच्या आहेत, असं मला सांगण्यात येतं. काही थोडे कपडे बॅगेमध्ये मी बरोबर घ्यावेत, असंही ते मला सांगतात. कुठं जायचं ते कळल्याशिवाय मी जागचा हालणार नाही, असं मी त्याना सांगतो. या नव्या स्थलांतराबद्दल निदान माझ्या वकिलास अंगर ज्यू धर्मगुरूस काही कल्पना द्या, अशी मी त्याना विनवणी करतो. ते मला सागतात की, मुकाट्यानं जर आला नाहीस तर उचलबांगडी करून नेऊ. माझं म्हणणं मी माडतच असतो. तेवढ्यात टेलिफोनची घंटा वाजू लागते, तो सांगतो 'आम्ही निघतच आहोत.' क्षणभर मला काही सुचेनासं होतं. कारण घरात मी एकटाच असतो आणि या नव्या बदलीस घरातला कोणी साथीदारही नसतो. निघण्याबद्दलचा तर आता तगादा सुरू झाला. बाहेर आणलेल्या वाहनात बसण्याखेरीज गत्यंतर नसत.

राष्ट्रीय सुरक्षा कचेरीत मला सांगण्यात येतं की, माझं नागरिकत्व रद्द करण्यात आलं असून माझी देशातून हकालपट्टी होत आहे आणि मला लगोलग विमानतळाकडे जावं लागेल. अशा प्रकारचा हुकुम फक्त एखादा न्यायाधीशच देऊ शकतो. त्याची अंमलबजावणी होण्यासाठी साठ दिवसांची मुदत मिळायला पाहिजे आणि त्या हुकमाविरुद्ध अपील करण्याची संधी मिळाली पाहिजे, इत्यादी स्वरूपाच मी काही बोलतो. तेव्हा गृहमंत्र्यांचे सहाय्यक मला सांगतात, 'इस्रायलमधून अपील करा.' म्हणजे माझी रवानगी इस्राएलमध्ये होत आहे तर! दोन दिवसापुरता लागू पडणारा प्रवास परवाना माझ्या हातात देतात. मग एक इस्रायली प्रतिनिधी माझ्या प्रवास—परवान्यावर इस्रायलचा व्हिसा नोदवतो आणि त्याच्याबरोबर चलण्यासंबंधी सुचवितो. 'टिमरमनला मी एकटा सोडणार नाही, मी त्याच्याबरोबर विमानापर्यंत जाणार', असं इस्रायलचा प्रतिनिधी म्हणतो तेव्हा पोलीस अधिकाऱ्याशी त्याची जोरदार बोलाचाली होते. पण हा वादावादी होत असतानाच आम्ही सगळे त्या इमारतीबाहेर पडतो. तळमजल्यावर इस्रायलचे रक्षक असतात, तिथे दोन मोटारीही दिसतात. वातावरण विलक्षण तंग झालेलं असतं.

मी विमानतळावर पोहोचलो तेव्हा 'एओरो लाइन्स अर्जेंटिनास' विमान आमची वाट पाहात होते. विमानदलाचे सैनिक, माझ्याबरोबरचे इस्रायली अधिकारी आणि विमानतळ मुख्याधिकारी असे आम्ही सर्वजण विमानात गेलो. विमानानं उड्डाण केलं. ते रोमकडे जावयाचं होतं.

पुढं मला माझ्या बायकोकडून असं कळलं की, एका अमेरिकन विमानातून काही सुरक्षा अधिकाऱ्यांसमवेत वॉशिंग्टनला जाण्याचा बेत अमेरिकन वकिलातीने केला होता. माझ्या असंही लक्षात आलं की, रिओडी जानेरो, मॅद्रिद, रोम या विमानतळांवरील विरामांच्या वेळी माझ्यावर हल्ला होऊ नये यासाठी निरनिराळ्या देशांचे पोलीस हजर होते. एका अर्जेन्टाइन वृत्तपत्रात मी पुढे वाचलेल्या एका लेखात म्हटलं होतं की, घरातून आम्ही निघाल्यानंतर पंधराच मिनिटांनी लष्करी सैनिकांची एक तुकडी मला पकडून नेण्यासाठी दाखल झाली होती. एका शिपायाकडून मला असं समजलं की, माझ्या हद्दपारीची त्या गृहस्थानबद्धतेत मला मुद्दामच कल्पना देण्यात आली नव्हती. कारण तिथलं सगळं बोलणं अन्यत्र ऐकण्याची व शिवाय कसल्या कसल्या तारा जोडून माहिती मिळवण्याची व्यवस्था त्या घरात केली होती. मला जिवंतपणे देशाबाहेर जाऊ द्यायचं नाही, असं लष्करी अधिकाऱ्यांच्या एका गटानं ठरविलेलं होतं.

¤

मी इस्रायलमध्ये दोन दिवस होतो. माझा एक मुलगा इन्शेबर किबुटस्मध्ये, यॉन किप्पुरमध्ये राहतो. जनरल मेनेडेझ यांच्यासमवेत माझं आणि अर्जेन्टिनाचं नाव घेतलं जात असल्याचं मी रेडिओ ऐकतो तेव्हा मला समजतं. रेडिओवरील कार्यक्रम हिब्रू भाषेतील असतात आणि ती भाषा मला मुळीच अवगत नसते. काय सांगितलं त्याचं भाषांतर विचारून घेतलं, ते असं होतं — लष्करातील प्रमुख नेते जनरल मेनेडेझ यांनी माझ्या सुटकेचा फायदा घेऊन अर्जेन्टिनात लष्करी क्रांतीस सुरुवात केली आहे.

ते नुसतं ऐकूनही मी चक्रावून जातो. जनरल मेनेडेझ मला कधीच भेटले नाहीत आणि अद्यापही माझ्यापर्यंत पोहोचलेले नाहीत!

¤

माझ्या या हकीकतीचं काही तात्पर्य असायला पाहिजे, हे मला ठाऊक आहे; पण तात्पर्य केव्हा सागायचं? एखाद्या गोष्टीची अखेरी साधेल तेव्हाच ना? आणि ती अखेर आली आहे कोठे? विसाव्या शतकातील या वैशिष्ट्यपूर्ण कथेस मी 'अखेर' कशी जोडणार? कशाचीच अखेर आलेली नाही. तेव्हा अद्याप तरी तात्पर्य काहीच नाही. माझी एकही काळजी संपलेली नाही. माझ्या प्रेम-द्वेषाचे विषयही आहेत तिथेच आहेत.

आपल्या देशाच्या मृत व्यक्तीबद्दल अश्रू ढाळणं अर्जेन्टाइन राष्ट्र थांबवणार नाही, हे मला ठाऊक आहे. आपल्या देशाच्या क्रूरतेच्या इतिहासात आणि दुर्विलासामध्ये अर्जेन्टाइन जनता राष्ट्रभक्ताशी सर्वस्वी एकनिष्ठ राहिलेली आहे. मला येवढेच माहीत आहे की, कितीही टोकाचा छळवाद असो अथवा भीरुता असो, त्या गोष्टीवर मात करण्यात मी विजयी होणार आहे आणि सुखसमृद्धी कशी गाठायची, हेही आपल्या प्रयत्नाने अर्जेन्टाइन जनता अखेरीस शिकवणार आहे!

**समाप्त**

पुस्तके

# एका भ्रष्टासुराचा उदयास्त !
# भ्रष्टाचार्य अंतुले !

बाकी काही असो, १९८२ या नव्या वर्षाची सुरुवात महाराष्ट्राच्या दृष्टीने तरी एकदम झकास झाली. गेलं जवळजवळ दीड वर्ष या संपूर्ण राज्याला ग्रासून राहिलेल्या एका अभूतपूर्व भ्रष्टासुराचा अस्त १९८२ च्या पहिल्याच पंधरवड्यात महाराष्ट्राच्या जनतेने पाहिला. या भ्रष्टासुराचं नाव होतं बॅ. ए. आर. अंतुले !

अंतुलेसाहेबाची उचलबांगडी करण्यामध्ये श्रीमती मृणाल गोरे, बाबुराव सामंत, अॅडव्होकेट अशोक देसाई आणि न्यायमूर्ती लेन्टिन यांचा जेवढा वाटा आहे तेवढाच वाटा भारतातल्या वृत्तपत्र जगताचाही आहे. कारण या भ्रष्टासुराचं काळंकुट्ट रूप प्रथम वृत्तपत्रांमधूनच प्रकाशात आलं मुंबईचे 'मुंबई सकाळ,' 'महाराष्ट्र टाइम्स' व अरुण शौरी ऊर्फ 'इंडियन एक्सप्रेस' या दैनिकांनी अंतुलेंविरुद्ध भक्कम आघाडी उघडली होती आणि पत्रकारांना 'साप-विंचू' म्हणणारे हे मुख्यमंत्री त्यांच्यासमोर फार काळ टिकाव धरू शकले नाहीत.

'मुंबई सकाळ' या दैनिकाचं तर वैशिष्ट्य असं की, अंतुले सत्तेवर आल्यानंतर अवघ्या तीनच महिन्यात या दैनिकाचे संपादक माधवराव गडकरी यांनी मुंबईच्या सिद्धीविनायक देवळाच्या विश्वस्त प्रकरणावर 'मुंबई सकाळ'मध्ये लेख लिहिला (७ सप्टेंबर ८०) आणि इथेच त्यांची मुख्यमंत्र्यांशी पहिली चकमक उडाली. कारण या ट्रस्टचे त्या वेळचे शासकीय विश्वस्त हे अंतुल्यांचे साडू होते आणि त्यांनी विश्वस्तपदाचा त्याग करावा, असा धर्मादाय आयुक्तांचा निवाडा डावलून ते मंदिराचे विश्वस्त म्हणून काम पहात होते. या संबंध प्रकरणावर माधवरावांनी 'सिद्धिविनायका तूच सिद्ध हो !' असा झणझणीत लेख 'मुंबई सकाळ'-मध्ये लिहिल्यावर अंतुल्यांनी प्रतिहल्ला करून माधवरावांना गप्प करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये 'मुंबई सकाळ'चे ३५ हजार अंक असलेला टेंपो जाळण्यापासून, तर या लेखाबद्दल अटक व खटल्याच्या धमकावणीपर्यंत विविध मार्ग हाताळण्यात आले. एका परीने अंतुल्यांनी प्रतिआक्रमणाचाच पवित्रा घेतला. त्यामुळे हळूहळू ही लढाई रंगतच गेली. सिद्धिविनायकाचं प्रकरण महिन्याभरातच आटोपलं. अंतुल्यांच्या साडूना विश्वस्तपद सोडावं लागलं. पहिली फेरी माधवरावांनी जिंकली. पण म्हणून लढाई संपली नाही. नंतर भवानी तलवार आली. मुंबई हलवण्याची टूम निघाली. 'इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठान' स्थापन झालं. साखर-कारखाने व बांधकाम कंत्राटदारांकडून मोठ्या प्रमाणावर देणग्या 'वसूल' केल्या जाऊ लागल्या. माधवराव या प्रत्येक घडामोडीवर 'मुंबई-सकाळ'-मधून फैरी झाडतच होते. अंतुलेही स्वस्थ नव्हते. अटक-खटल्याची दमबाजी उपयोगी पडत नाही, असं पाहिल्यावर त्यांनी एकदम उलटीकडून सुरुवात केली. माधवरावांना कोकण विद्यापीठ समितीवर घेतलं. डिसेंबरात (१९ व २०) मुंबईला झालेल्या साहित्यसंमेलनात पुढाकार माधवरावांचाच होता. अंतुलेंनी या संमेलनाला पाठिंबा देणारं पत्रक काढलं. (अर्थात हे डोकं अंतुल्यांचं नव्हतं, हे नंतर उघड झालं.) मध्येच माधवरावांना त्यानी एक लंबी-चौडी खास मुलाखतही देऊन टाकली. पण लढाई थमण्याची चिन्हं दिसेनात; उलट अंतुल्यांचं आसन डळमळीत होऊ लागलं.

'शस्त्रक्रियेसाठी जहापनाह लंडनमुक्कामी असतानाच त्यांचे मंत्रिमंडळातील एक सहकारी रामराव आदिक यांनी दिल्लीला एक खेप मारली. आणि अस्वस्थ अंतुले धावत पळत भारतात आले. मुंबई-दिल्ली खेपांचं प्रमाण वाढतच गेलं, ते अखेरपर्यंत थांबलं नाही !

अशा या अनोख्या मुख्यमंत्र्याशी सुरुवातीपासून शेवटपर्यंत सतत दीड वर्ष झुंज द्यावी लागलेले माधवराव गडकरी अंतुल्यांच्या कार्याचा काही आलेख मराठी वाचकांसमोर स्वतंत्रपणे माडतील, अशी अपेक्षा होती आणि माधवरावांनी तीही पूर्ण केली; पण अगदी वेगळ्या तऱ्हेने !

सप्टेंबर १९८० ते जानेवारी १९८१ या काळात माधवरावांनी 'मुंबई सकाळ' मध्ये अंतुल्यांच्या वेगवेगळ्या लीलांवर जे खास लेख लिहिले ते त्यांनी विशिष्ट पद्धतीने एकत्र केले. त्यामध्ये 'तीनदा मंत्री, तीनदा भ्रष्टाचार ?' या आणखी एका दर्जेदार अप्रकाशित संपादकीय लेखाची भर घातली. अंतुलेना दोषी ठरवणारं न्या. लेटिन यांच निकालपत्र संक्षिप्त स्वरूपात दिलं. यातूनच एक अलीकडच्या काळातलं अतिशय वादग्रस्त राजकीय व्यक्तिमत्त्व उभं राहिलं—'भ्रष्टाचार्य अंतुले !'

एकूण एकोणीस लेखांचं संकलन असलेल्या या पुस्तकाची सुरुवात सिद्धिविनायक विश्वस्त प्रकरणाने होते, तर 'तीनदा मंत्री, तीनदा भ्रष्टाचार ?' या अंतुलेंच्या कार्यपद्धतीचं विश्लेषण करणाऱ्या लेखानं पुस्तकाचा शेवट होतो. दरम्यानच्या काळात भवानी तलवार, अंतुल्यांची खास मुलाखत, अंतुले–सरकारच्या एक वर्षाच्या कारकीर्दीचा आढावा, साखर कारखान्यांच्या देणग्या, सिमेंट–वाटपातील प्रचंड भ्रष्टाचार असे अंतुलेंच्या कारकीर्दीतील ठळक विषय माधवरावानी आपल्या लेखामधून निर्भीड व सडेतोडपणे मांडले आहेत. पुस्तकाच्या शेवटी ज्यामुळं अंतुलेंची उचलबांगडी झाली त्या सिमेंट–प्रकरणातील भ्रष्टाचाराचा स्वच्छ तक्ताच दिलेला आहे. या सगळ्यामधून अंतुलेंचा धसमुसळेपणा, बेफिकिरी, त्यांच्या राजवटीत भ्रष्टाचाराला मिळालेली राजमान्यता, न्यायसंस्था व वृत्तपत्राविषयीचा अंतुलेंचा द्वेष आणि या सगळ्याचा कळस असलेली सत्ताधताच व्यक्त होते. माधवरावानी अंतुलेंची घेतलेली मुलाखत विशेष वाचनीय आहे. त्यातून व अन्य लेखांमधून मद, मोह व मत्सराने ग्रासलेल्या सत्ताधीशाचं एकसंध व्यक्तिमत्त्व साकार होतं. महाराष्ट्राच्या गेल्या बावीस वर्षांच्या इतिहासात प्रथमच निर्माण झालेल्या एका सत्तान्ध भ्रष्टासुराच्या उदयास्ताचा आलेख स्पष्ट होतो !

सभा किंवा पत्रकार–परिषदांच्या निमित्तानं अंतुलेंचं मला झालेलं दर्शनही यापेक्षा फारसं निराळं नव्हतं. त्याची बोलण्याची स्टाइल अशी होती की, ते सारखे कुणावर तरी दात–ओठ खात आहेत, कुणाविषयीचा तरी संताप, द्वेष त्यांच्या मनात उफाळतो

आहे, असं सतत वाटायचं. हा मनुष्य कधी स्थिर चित्ताचा वाटलाच नाही. गेल्या वर्षी जुलैमध्ये पुण्यात मंत्रिमंडळाची बैठक झाली तेव्हा अंतुलेंनी आपल्या 'जनता दरबारा'चा पहिला प्रयोग सादर केला. समोर आलेल्या याचकाला ते देणग्या मोठ्या उदार मनाने जाहीर करायचे; शिवाय, गरिबांना वाटण्यासाठीच जर मी श्रीमंतांकडून पैसे घेत असेन तर त्यात वावगं काय, असा सवालही जाहीर सभांमधून करायचे. गरिबांविषयी आपल्याला वाटणारा तथाकथित कळवळा आपल्या बोलण्या–वागण्यातून सतत दाखवण्याचा त्यांचा कटाक्ष असायचा.

त्यांचं हे सारं ऐकून–पाहून अनेकजण 'सी. एम. फारच डॅशिंग आहे बुवा!' असे सकौतुक आश्चर्योद्गार काढायचे. मला त्या प्रत्येक वेळी दोन व्यक्तींची आठवण व्हायची. एक म्हणजे संजय गांधी आणि दुसरा अमिताभ बच्चन! अंतुलेंची काम करण्याची पद्धत संजय गांधींसारखीच होती. तोच घसमुसळेपणा, बेदरकारपणा, बेछूटपणा त्यांनी आपल्या वागण्या–बोलण्यात आणला होता.

त्यांचं गरीबी हटवण्याचं तत्त्वज्ञान मात्र थेट देमार चित्रपटातल्या अमिताभच्या डायलॉगशी जुळणारं! जणू, अंतुले स्वत:ला राजकारणातला अमिताभ बच्चनच समजत होते! माधवरावांचं पुस्तक वाचताना ही दोन रूपं सतत डोळ्यासमोर येत होती.

राजकारणातील व्यक्तींची कृष्ण–कृत्यं यापूर्वीही उघडउघड किंवा कादंबऱ्यांच्या माध्यमांतून प्रसिद्ध झाली आहेत पण एखाद्या राजकारण्याच्या कारकीर्दीत वेळोवेळी लिहिलेले लेख फक्त एकत्र करून त्याद्वारे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचं दर्शन घडवणं हे खरोखरच कठीण काम होतं. माधवरावांनी ते यशस्वीपणे केलं आहे. अर्थात या त्यांच्या यशात जनाब अंतुलेंचाही वाटा आहेच!

—सतीश कामत

भ्रष्टाचार्य अंतुले
माधव गडकरी
कोहिनूर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे १६५, किंमत २५ रुपये.

## फिनिक्स निवड

# Our Magnificent Wildlife

How to enjoy and preserve it?
(Reader's Digest, Association,
Pages 336, Rs. 185/–)

काही पुस्तके अतिशय वाचनीय असतात. आपण पुस्तक वाचताना मध्येच मित्रांनी डिस्टर्ब केलं व आपण पाल चुकचुकल्यासारखं केलं तर पुस्तक थोड्या अंशी निश्चित वाचनीय असतं. वाचताना बायकोनं डिस्टर्ब केलं व कपाळाला आठ्या पडल्या की, समजावं पुस्तक वाचनीय आहे खास; पण पाव्हण्यानं आपल्याला वाचताना डिस्टर्ब केलं व आपण खेकसल्यासारखं केलं की समजावं पुस्तक A ग्रेडचं आहे!

परंतु काही पुस्तकं चक्क 'प्रेक्षणीय' असतात. कुठलेही पान उघडावे. रंगीबेरंगी व काळी–पांढरी चित्रे बघावी. (ज्या पुस्तकात या दोन्ही प्रकारची चित्रे असतात ती अधिक 'प्रेक्षणीय' असतात नुसत्या कलरने व नुसत्याच–काळ्या पांढऱ्या चित्रांनी 'मोनॉटनी' जाणवते.) कुणीही डिस्टर्ब केलं तरी चेहऱ्यावर हास्यच रहातं. आपण आसनावरनं उठून सस्मिताने आपलं काम पार पाडतो व परत स्थानापन्न होतो आणि कसलाही आकस न धरता परत प्रेक्षणीय पुस्तकात दंग होतो.

अर्थात हे असे घडायला तुमच्या 'प्रेक्षणीय' पुस्तकात कोणती चित्रे आहेत याच्यावर अवलंबून असतं. स्वच्छ निसर्ग, नितळ पाणी व अनेक प्रकारच्या प्राण्यांची चित्रे असतील तर प्रदूषणविरहित जंगलात स्वच्छ हवेने आपण ताजेतवाने झालो आहोत, असे आपल्याला वाटते!

म्हणून घरी 'डिस्टर्ब' होण्याचा चान्स असेल तर प्रेक्षणीय पुस्तके हातात घेऊन स्थानापन्न व्हा.

आमच्या ग्रंथालयात वन्यजीवनावर अनेक पुस्तके आहेत. 'नॅशनल जिऑग्राफिक'ची तीन–तीनच्या गठ्ठ्यात बाइंड केलेली शेकडो मासिके आहेत; पण या पुस्तकांइतकी सुंदर चित्रे व मथळे मी कुठेच पाहिले नाहीत! कधी-कधी नॅशनल जिऑग्राफिकमध्ये रंगांची इतकी उधळण असते की, ती बटबटीत वाटावी. निदान मला तरी ती केव्हा केव्हा तशी वाटली आहेत. कारण एक तर रंगाचा शिडकावा थोडा लाइट आहे व दुसरे म्हणजे, चित्रांनी संपूर्ण पानं न भरता इतर स्केचेस व डायग्रॅमबरोबर जक्स्टॅपोझ केले आहे. कधीकधी पानाच्या पांढऱ्या रंगाशी इतर चित्रे जक्स्टॅपोझ झाली आहेत. त्यामुळे बटबटीतपणा अजिबात वाटत नाही.

या पुस्तकातील वन्यजीवनाचा एक मासला देतो. त्या भागाचे नाव आहे 'Scotland's Ospreys Come Home' 'ऑस्प्रे' हे नाव ऐकलंय कधी? मी तरी कधीच ऐकलं किंवा वाचलं नव्हतं; परंतु या पुस्तकात त्याचे फोटो व माहिती वाचल्यानंतर हे नाव मी तरी हयातीत विसरणार नाही.

काय आहे या नावात एवढं? अनिकस्प्रे, अमूलस्प्रे, मिल्कस्प्रे, नॅस्प्रे वगैरे काही भानगड नाही. हा एक बहिरीससाण्याचा किंवा श्येन जातीचा पक्षी आहे. पंख पसरले की, एका माणसाएवढी रुंदी भरेल! भलताच चपळ. मासे खाऊन जगतो. मासे पकडायला पंख अर्धे बंद करून चक्क पाण्याच्या आत डाइव्ह घेतो. स्प्लॅश! पाण्याच्या बाहेर आला की, परत कोरा. कारण त्याचा पिसारा डकबॅक वॉटरप्रूफ! मासा धरला की, ठराविक उंच जागी खाऊन नॅपकिनने आपल्या नखी (talons) पुसत नाही. परत झेप घेतो व पाण्यात अर्धे पाय बुडवून उडतो. जगात जेवून असे हात (किंवा पाय!) कुणी धुवेल का? ऑस्प्रे बछड्याला ट्रेनिंग कसा देतो? छोट्यांना मासे पकडण्याची एक आठवडाभर ट्रेनिंग देतो. पूर्वीसारखे अगदी नियमित खाद्य न आणता कधीकधी मासा आणून चोचीतून मुद्दाम सोडून देऊन पाण्यात पडण्याच्या आधीच परत त्याला धरतात. एकाच हातात चेंडू घेऊन वरून तो सोडून देऊन जमिनीवर पडण्याच्या आधी त्याच हाताने धरायची प्रॅक्टिस बऱ्याच लोकांनी लहानपणी केली असेल. तसेच!

हा एक छोट्यांना चिडवण्याचा किंवा डिवचण्याचा प्रकार. क्षुधेने व्याकूळ झालेले हे छोटे किंचाळत या मम्मी-पप्पांच्या चोचींतून पडणाऱ्या माशाकडे हवेत कॅच करायला झेपावते व थोड्याच दिवसांत थोडी खाली झेप मारताना दहा फूट पाण्याच्या वर असताना थांबायचा प्रयत्न करते आणि पोटावरच (belly-flop) करते आणि पाण्यावर आदळते! थोड्याच सेकंदांत राजीवला असं ट्रेनिंग देऊ शकता बाई ?

लहानग्यांनी अशी शिकार केली की कुटुंब वेगळे होते. HUF बरखास्त! छोटे थोडे मोठे झाले की डेस्टिनेशन आफ्रिका! इथे स्कॉटलंड टू आफ्रिका उडताना असा ग्रेस की कॉंकार्डचे नाक लाजेने खाली!

त्याचा रंग वरती तपकिरी व खाली पांढरा असा असतो.

१९५० नंतर DDT च्या माऱ्याने उत्तर अमेरिकेचे ऑस्प्रे बरेच कमी झाले होते. ब्रिटिश ऑइल्समध्ये तर १९१० पर्यंतच ते निःसंतान झाले होते; परंतु १९५९ साली तिथे स्प्रे साईडजवळ चमत्कार घडला. इतक्या वर्षांनंतर ते इथे परत वास्तव्य करू लागले. म्हणून आपल्याकडे जसा 'प्रोजेक्ट टायगर' तसा तिथे 'प्रोजेक्ट ऑस्प्रे'! स्प्रे ही स्कॉटलंडमधील नदी. म्हणजे त्याच्या जवळपासच कुठे तरी स्प्रे साईड असेल. ही नदी व त्याचा परिसर सॅमन मासा व व्हिस्कीसाठी प्रख्यात आहे.

ऑस्प्रेंना उघड्या पंखांनी सहज आत जाता यावं एवढं मोठं त्याचं घरटं असतं. वुलन कोटात असतं तसं आतून लाइनिंग शेवाळं व हिरवळीचं. एका बर्डवॉचरने (Clinton Abbot) किती वस्तूंचे हे घरटे केले या कुतूहलाने सर्व वस्तू मोजल्या. जवळजवळ चाळीस वेगवेगळ्या वस्तूंचे हे घरटे होते. त्यात तेलाच्या चिंध्यांपासून मुलाच्या खेळण्यातल्या गाडीच्या चाकापर्यंत सर्व वस्तू होत्या!

पोचर्सनी या पक्ष्यांना निःसंतान करू नये म्हणून स्प्रेसाईड येथे चोवीस तास पहारा असतो.

दरवर्षी शंभरएक स्वयंसेवक (विद्यार्थी, कारकून, मिलिटरीतील निवृत्त लोक व गृहिणी असा काफिला! आपले प्रकाश गोळे रविवारी सकाळी लोकांना घेऊन बंडगार्डनजवळ फिरवतात ना, तसे. बर्डवॉचिंगसाठी! पण इथे हे लोक 'वॉच'ही करतात व वन्यजीवांना संरक्षणही देतात!) चक्क ऑस्प्रेच्या घरट्यापासून दोनशे फुटांवर ठाण मांडून बसतात-अहोरात्र पहारा करत! निरीक्षणासाठी इथे टेलिस्कोपही आहे.

ऑस्प्रेचं झालं हे एक व्हिग्नेट (Vignette). असंच आपण एकेका वन्यजीवाची स्वभावचित्रणेच या पुस्तकात बघतो.

शेवटी 'where to see wildlife' असे एक प्रकरण आहे. त्यात सर्व खंडांतील वन्यजीवनाची माहिती दिली आहे. 'माणूस'च्या १५-२-७९ च्या अंकात मी 'Snow Leopard' विषयी लिहिले आहे. हा बोका भलताच सुंदर आणि गुबगुबीत असतो. हा प्राणी बघायला मिळणं म्हणजे एक प्रकारचं 'रिव्हिलेशन' च! हा पाकिस्तानच्या हिंदुकुश पर्वतात व इतर काही भागात वावरतो त्या निसर्गात मोकळा असा एकच फोटो आहे. तो जॉर्ज शॅलरनी ('माणूस' २७-६-८१-सॅरेन्जेटी लायन फेम) घेतला होता. या हिमचित्त्याचा फोटो या पुस्तकात आहे.

या पुस्तकाने माझी तरी दुधाची तहान ताकावर भागली!

—जे. एन्. पोंडा

---

### – नवीन दाखल झालेली पुस्तके –

१. एका पानाची कथा-(आत्मचरित्र)-वि. स. खांडेकर
२. वाटेवरल्या सावल्या-(आत्मचरित्र)-ग. दि. माडगूळकर
३. माझा खेळ मांडू दे-(आठवणी)-शांता शेळके

1. **The White Hotel**–( Bestseller–Psychological Novel ) D. M. Thomas
2. **Bardot**–( Biography)–Willi Frischauer
3. **Entropy**–( A new world order )–Jeremy Rifkin with Ted Howard
4. **Midas**–( Financial thriller )–Piers Kelaart
5. **The Buchwald Stops Here**–(Humour–Satire on Current events)–Art Buchwald
6. **Night Probe !**-(Bestseller-Thriller)–Clive Cussler

★ *Phoenix—The Library which constantly adds new dimensions to reading !*

**द फिनिक्स लायब्ररी**

७२७, सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

रंगभूमी

# नस्तं झेंगट

'ॐ नाट्यगंधा' या संस्थेचे 'वस्त्रहरण' हे नाटक रंगभूमीवर उदंड गाजले. याच संस्थेतर्फे विनायक दामले यांनी लिहिलेले आणि दिलीप कोल्हटकर यांनी दिग्दर्शित केलेले 'नस्तं झेंगट' किंवा संगीत 'नस्तं झेंगट' हे विनोदी नाटक नुकतेच रंगभूमीवर आले.

प्रकाश बुजरे (अरुण जोगळेकर) नावाचा एक हुन्नरी माणूस. घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजण्याचा, शिवाय स्वतः जाऊन लष्कराला त्या खाऊ घालण्याचा या माणसाला छंदच होता. या त्याच्या छंदाला त्याची बायको ज्योती (भारती आचरेकर) मात्र केवळ कंटाळलेलीच नाही, तर प्रचंड वैतागलेली. त्याची आणि पर्यायाने स्वत.ची या सगळ्या गोष्टींपासून सुटका करुन घेण्यासाठी ज्योतीने आपल्या मास्तर शेजाऱ्याच्या मदतीने (मास्तर–विनायक दामले) प्रकाशला धडा शिकवण्याचे ठरवले. पण या प्रकरणात ज्योती स्वत.च एका झेंगटात सापडली. अखेर प्रकाशनेच तिला सुखरूपरीत्या सोडवले आणि सांगितले, 'झेंगट' गळ्यात घ्यावीत; पण त्यानीच–ज्यांना ती नीट पार पाडता येतात !'

'वस्त्रहरण' प्रमाणेच 'नस्तं झेंगट' मध्येही या कथानकाचा अत्यंत जरुरीपुरता आधार घेऊन एक–एक किस्सा एकापुढे एक मांडला आहे. काही सन्मान्य अपवाद वगळता बहुतेक सगळे किस्से अत्यंत सामान्य दर्जाचे आणि फिरकोळ शब्दच्छल करून लिहिलेले आहेत. पण तरीही नाटक काही ठिकाणी येणारा कंटाळा सोडल्यास बरेच सुसह्य होते. त्यासाठी अरुण जोगळेकर आणि भारती आचरेकर या दोघाचा अभिनय आणि यशवंत देव याचे संगीत प्रामुख्याने जबाबदार आहेत.

हल्लीच्या बऱ्याच नाटकांमधून असे जाणवायला लागते की, चित्रपट–माध्यमाचे आविष्करण नाटकाच्या केवळ तांत्रिक बाबींमधूनच नाही, तर रंगभूमीवरील वर्णनातूनही घडते आहे. त्यासाठी अनेक वेगवेगळ्या क्लृप्त्या (रंगमंचावर वाद्यवृंद बसवणे, साइडस दाखवणे इत्यादी) नाटकामधून वापरल्या गेल्या. मग प्रत्यक्ष नाटकाच्या अनुभवपरिपोषासाठी या सगळ्याचा उपयोग होत आहे का आणि असल्यास किती प्रमाणात, याचे भान ठेवले गेले नाही किंवा त्याकडे सोइस्कर दुर्लक्ष करण्यात आले. या सगळ्या पार्श्वभूमीवर 'नस्तं झेंगट'चे वेगळेपण चांगलेच उठून दिसते. संपूर्ण नाटकात प्रकाश व ज्योती (अधूनमधून एखादे अन्य पात्र) हे दोघेजण एकेकटे अथवा युगुलगीते या स्वरूपात सुमारे डझनभर गीते म्हणतात. (गीत व संगीत दोन्ही यशवंत देव यांचे) ही सर्व गीते दोन्ही पात्रे असल्या ठिकाणचे माईक उचलणे, ठेवणे इत्यादी नखरे न करता जुन्या संगीत नाटकांप्रमाणे अगदी मुकाट्याने म्हणायची; पण त्याच वेळी या गाण्यांचा संगीत जलशा बनणार नाही, याची काळजी घेऊन योग्य तो अभिनय करायची, इतरांना प्रतिसादसुद्धा द्यायची.

यशवंत देव याची ( काही ठिकाणची शब्दमजुरी सोडल्यास ) गीते आणि संपूर्ण नाटकाचे संगीत हे या नाटकाचे सर्वांत प्रमुख वैशिष्ठ्य. नाटकाच्या सुरुवातीचे ' डिस्को ' शैलीचे 'नस्तं झेंऽऽगट, नस्तं झेंगट' यापासून सुरू झालेले संगीत कधी नाट्यसंगीत(चाळीतील चौकाची बिघडवी हवा–या गाण्याच्या वेळी अरुण जोगळेकरांनी निरनिराळ्या गायकांच्या केलेल्या नकला फारच सुरेख), कधी अत्यंत उडत्या चालीचे गाणे. कधी दर्दभरे भावगीत असे अनेक साज लेवून संपूर्ण नाटकातून कानावर येते. अरुण जोगळेकर आणि भारती आचरेकर यांनी सूर, स्वर आणि चर्या याच्या साह्याने हे संगीत केवळ श्रवणीयच नाही तर प्रेक्षणीयही बनवले. ( या दोघाकडे पांहातच नाटकातील कित्येक पीळ विनोद मी नुसते सहनच केले असे नाही; तर बऱ्याचदा त्या विनोदांना हसलो सुद्धा.) ' मी चिडू नको तर काय करू '–ज्योती, ' एक तरी जन्म काढून दाखव म्हणावं सावित्रीला '–ज्योती, ' हिला काही कळतच नाही '–प्रकाश, ' संसार हा सुखाचा '–प्रकाश, ज्योती ही नाटकातील काही उल्लेखनीय गीते.

दिलीप कोल्हटकरांनी दिग्दर्शित केलेल्या ' कशात काय अन् लफड्यात पाय ' या फार्सपाठोपाठ आलेले हे विनोदी नाटक. नाटकातील कित्येक जागा कोल्हटकरांनी अतिशय सुरेख खुलवल्या आहेत. प्रकाशने प्रीतिबाला नाचरे ( मधुवंती घोटीकर ) या मुलीबरोबर एका नाटकातील बलात्कारदृश्याची केलेली तालीम हा कोल्हटकरांनी रंगवलेला संपूर्ण नाटकातील सर्वोत्कृष्ट प्रसंग (मात्र या प्रसगाच्या पाठोपाठ आजकालच्या ' हिट अँड हॉट ' नाटकावर टीपाटिप्पणी करणारा एक प्रसंग–त्यात मग प्रकाशच्या अंतर्मनाचा नटराजाशी झालेला संवाद–हा गंभीर पीळ घालून संपूर्ण नाटकाच्या विनोदीपणाला त्यांनी आणि लेखकानेही एक गालबोट कशाला लावून ठेवले, हे मात्र समजले नाही.) प्रकाश आणि ज्योती घराच्या गॅलरीत आले आहेत, हे दर्शविण्यासाठी मधूनच रंगमंचावर उठून खडा होणारा गॅलरीचा कठडा हा प्रकारही नंतर सवयीचा होत असला; तरी सुरुवातीला काही वेळ मजा आणतो.

आधी उल्लेख केलेला प्रकाश-नटराज संवादाचा भाग आणि प्रकाश-ज्योती कठड्याजवळ आल्यानंतर त्यांच्यावर पिवळसर उन्हाची वा निळसर चांदण्याची पडणारी तिरीप सोडल्यास बाकी सर्व नाटक हे स्वच्छ पांढऱ्या प्रकाशात उजळलेल्या रंगमंचावर घडते; त्यामुळे निष्कारण अंधुक प्रकाशातील हालचाली टिपत आणि रंगमंचावर काय चालले असेल याबद्दल नजरेला आणि कल्पनाशक्तीला ताण देत प्रेक्षकाला बसावे लागत नाही.

' वस्त्रहरण ' हे मराठी रंगभूमीवरील मैलाचा दगड वगैरे असल्याचा दावा कुणीही करणार नाही; पण त्याच वेळी त्याच्या सर्व गुणदोषासह ते प्रेक्षणीय नक्कीच आहे.

' नस्तं झेंगट ' बद्दलही हेच म्हणता येईल.

–सदानंद बोरसे

# मुंबई वार्ता

पृष्ठ ४ वरून

काही अंशी कवितेशी जुळतं ! आता खरं म्हणजे या विलक्षण विधानामुळं अर्थशास्त्र-प्रेमी आणि काव्यप्रेमी अशा दोहोंचाही सात्त्विक संताप मी ओढवून घेईन याची मला पूर्ण कल्पना आहे आणि तरीही हे धाडसी विधान मी करते आहे. अर्थसंकल्प आणि कविता या दोन्हीचाही अर्थ आपण लावण्यावर अवलंबून असतो. दोन्हीनाही अर्थांच्या आणि सूचितार्थांच्या, इम्प्लिकेशन्सच्या अनेकानेक शक्यता असतात. कॅलिडोस्कोपमधली नक्षी कोन बदलला की बदलते. तसा अर्थसंकल्पाचा अर्थही निरनिराळ्या दृष्टिकोनांतून पाहिला की निरनिराळा जाणवतो. त्यामुळे कविता आणि अर्थसंकल्प या दोहोनाही समजून घ्यायला एखाद्या जाणकार टीकाकाराची खंबीर मदत फार उपयोगी पडते !

फोरम ऑफ फ्री एंटरप्रायजेसतर्फे दरवर्षी अर्थसंकल्पावर होणारी नानी पालखीवालांची भाषणं हा या क्षेत्रातला अगदी अंतिम जरी नाही, तरी अधिकाराचा शब्द समजला जातो. खरं म्हणजे विषय अर्थसंकल्पासारखा रुक्ष आणि तांत्रिक; पण या भाषणांना श्रोतृवर्गाची कधीच कमतरता नसते. अर्थसंकल्पावर तसे बऱ्याच संस्थांतर्फे बरेच कार्यक्रम होतात; पण या भाषणांचा मान काही औरच ! व्यापारी, बिझिनेसमन, प्राध्यापक, विद्यार्थी, पत्रकार, अर्थतज्ज्ञ अशाच्याबरोबरच, ऑफिसमधून घरी जाताना आवर्जून वळलेले साधे-सुधे मध्यमवर्गीय नोकरदार यांचीही गर्दी या भाषणाना असते. अर्थसंकल्पाच्या पालखीवालांनी लावलेल्या अन्वयातला हा काही निवडक भाग.

यंदाच्या अर्थसंकल्पाचं सर्वात मोठं वैशिष्टच म्हणजे त्याची वैशिष्टयहीनता ! तो एक अतिशय पुचाट, इनसिपिड अर्थसंकल्प आहे. त्याला स्वत चा तोंडवळा नाही, नावीन्य नाही आणि त्यातून खास हाती लागण्यासारखं काही नाही. रुळलेली चाकोरी त्यानं जराही सोडली नाही. एवढ्या मोठ्या देशाच्या अर्थव्यवस्थेला दिशा किंवा गती देईल अशी क्षमता त्याच्यात नाही. तो केवळ एखाद्या किराणा–भुसार दुकानाचा थोड्या मोठ्या प्रमाणावर केलेला अर्थसंकल्प आहे एवढंच ! त्यातल्या उल्लेखनीय बाबी म्हणून आयकरातून दिल्या जाणाऱ्या सुटीची वाढवलेली मर्यादा, सिमेन्टच्या दुहेरी किमतीची योजना, सोशल सिक्युरिटी सर्टिफिकिटस अशा थोड्या-फार गोष्टींचा उल्लेख करता येईल.

पण अर्थव्यवहाराच्या एकूण चित्राच्या पार्श्वभूमीवर पाहिलं, तर या गोष्टींचा अर्थ आणि महत्त्व एकदम स्पष्ट होईल. पैशाची किंमत झपाट्यानं कमी होते आहे. 'गेले ते पूर्वीचे दिवस !' वगैरे जी जनरल शेरेबाजी आपण सर्वसामान्य माणसं करत असतो, ती अगदीच खुळचट नाही. तिला चांगला भक्कम अर्थशास्त्रीय आकडेवारीचा आधार असतो. १९३९ च्या रुपयाची किंमत शंभर पैसे मानली, तर आज त्याची किंमत केवळ चार पैसे उरली आहे ! १९५० सालचे १६ पैसे हे आजच्या रुपयाच्या बरोबरीचे होते. तेव्हा ठेवींवरच्या व्याजाला, डिव्हिडंडवर तीन हजाराऐवजी चार हजारांवर आयकरमर्यादा आणून ठेवली असली, तरी मुळात तीन हजाराची मर्यादा ठरवली गेली होती ती १९७४ मध्ये आणि आज ते तीन हजार, चार हजार आठशेपन्नासएवढे आहेत. संपत्ति–कराची मर्यादा १९७० साली दीड लाखाच्या मालमत्तेपर्यंत होती. आता ती एक लाख पासष्ट हजारावर आणण्यात आली आहे खरी; पण त्या मालमत्तेची किंमत आज चार लाख पंधरा हजाराच्या घरात आहे. तेव्हा करदात्यांना काही सूट तर नाहीच, तो केवळ आभास झाला. भारतीय करदात्यासारखा दुसरा दुर्दैवी प्राणी जगात नसेल! खरं म्हणजे 'प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टू ॲनिमल्स'च्या धर्तीवर 'प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टू टॅक्सपेअर्स' असा एखादा कायदाच करायला हवा ! स्वीडनमध्ये किमान आयकर आहे १%, फ्रान्स ५%, कॅनडा ६%, यु. एस. ए. १२% आणि भारतात किमान आयकर आहे ३३% ! तेव्हा हा आपला सोशिकपणाच नव्हे का ?

या देशाच्या मूलभूत आणि जुनाट प्रश्नांना या अर्थसंकल्पानं कुठेही हात घातलेला नाही. बेकारीच्या उच्चाटनाची योजना या अर्थसंकल्पात नाही. गतवर्षी सहा लाख नोकऱ्या उपलब्ध झाल्या खऱ्या; पण संकल्प होता दहा लाखाचा आणि आवश्यकता होती चौदा लाखांची ! याचा सतत वाढत्या लोकसंख्येशी मेळ घातला की, चित्र अधिकच भयानक बनतं. काळ्या पैशाचाही असाच मूलभूत प्रश्न आहे की, ज्याला कसून हात घातला जायला पाहिजे; पण हे प्रयत्न एवढे तुटपुंजे आहेत की, या डी–हायड्रेटेडदेशाला केवळ आय–ड्रॉपरनं पाणी पाजण्यासारखेच ते आहेत. गंमत अशी की, काळा पैसा बाहेर पडण्यासाठी असणाऱ्या बेअरर बॉण्डसमधून साडेआठशे कोटी रुपये मिळण्याची अपेक्षा आहे, तर पांढऱ्या पैशाच्या गुंतवणुकीसाठी असणाऱ्या कॅपिटल इन्व्हेस्टमेन्ट बॉण्डसच उद्दिष्ट फक्त अडीचशे कोटींचं आहे. म्हणजे काळा आणि पांढरा पैसा काय प्रमाणात या देशात आहे त्याला ही राजमान्यताच झाली म्हणायची !

उत्पादकता-वर्ष म्हणून या वर्षाचा बराच गाजावाजा केला गेला खरा; पण प्रत्यक्षात औद्योगिक वित्तीय संस्थांना दिली जाणारी तीनशेबासष्ट कोटीची मदत ब्याऐंशी कोटीवर आणली गेली ! १९६० साली जागतिक बाजारपेठेत आपली एक टक्का निर्यात होत असे, आज ती चारदशांश टक्क्यांइतकी खाली आली आहे. निर्यातीला प्रोत्साहन मिळण्यासाठी म्हणून मांडलं गेलेलं प्रपोझल पालखीवालानी शब्दशः उद्धृत केलं, ते तर अनिश्चितपणाचा कळस आहे. काही उद्दिष्ट असणाऱ्या काही रकमेची उलाढाल असणाऱ्या काही कंपन्यांना, काही वस्तूंवर, काही अटींवर आणि निर्बंधांवर काही प्रमाणात सूट देण्यात येईल, अशी एक साधारण शुभेच्छा तेवढी त्यातून व्यक्त होते !

ज्या गोष्टीचा अर्थसंकल्पात उल्लेखही नाही ती गोष्ट म्हणजे सरकारी खर्च. आपल्या सरकारचा खर्च पांढऱ्या हत्तीसारखा अगडबंब आहे ! उभ्या जगात आपल्याइतकी स्वस्त नोकरशाही आणि महागडं सरकार शोधूनही सापडणार नाही ! आपल्याकडच्या अधिकाऱ्यांना सर्वांत कमी पगार असतो. आपल्या सरकारी खर्चात ताळमेळ किंवा सुसूत्रता, काटकसर या नावाची काही गोष्टच नाही ! साधे इन्कमटॅक्स रिटर्नचे फॉर्म्स; पण ते दहा वेळा बदलले जातात. मग ते परत परत भरून देण्याचं करदात्याचं काम वाढतं. शिवाय अगोदर भरलेले सगळे फॉर्म्स-तोही चांगला १५–२० पानांचा एक फॉर्म–असे किती तरी थेट कचऱ्याच्या टोपलीत ! स्टेशनरीची ही केवढी उधळपट्टी आहे ! सरकारी गलथानपणाचा हा केवळ एक नमुना आहे. आपल्या सरकारकडे ज्ञानापेक्षा ठोकळेबाज माहिती अधिक चातुर्य आणि व्यवहारीपणापेक्षा विद्वज्जडता अधिक आणि लवचिक कल्पकतेऐवजी रोखठोक बुद्धिमत्ता अधिक असा सारा प्रकार आहे !

अर्थशास्त्रीय विश्लेषणाच्या चौकटीबाहेर पडून, भाषणाच्या शेवटी पालखीवालांनी जे आवाहन केलं, ते हृदयस्पर्शी होतं. तरुणांना उद्देशून त्यांनी म्हटलं की, दारिद्र्याच्या बाबतीत आपला जगात पंधरावा क्रमांक लागतो. या परिस्थितीतून बाहेर पडायचं असेल, तर तरुण रक्ताच्या, ताज्या दमाच्या अर्थशास्त्रज्ञांची, अधिकाऱ्यांची, राजकारण्यांची, प्रशासकाची, उद्योजकांची आपल्याला निकडीची गरज आहे आणि या देशाच्या

MANOOS ( Marathi Weekly ) 5·00 Rupees Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11 )

अनेक नागरिकाप्रमाणे मीही तरुणांकडे मोठ्या अपेक्षेनं बघतो आहे.

— ललिता बर्वे

## सामंतांचे नेतृत्व बाजूस सारून

# पॉलिकेम सुरू !

'इंडियन एक्स्प्रेस'चा परिणाम म्हणूनच की काय कोण जाणे, पण कामगार-नेते डॉ. दत्ता सामंत याचे एकेक बालेकिल्ले आता कोसळू लागले आहेत. ज्या वेळी डॉ. सामंतांनी एक्स्प्रेसमध्ये, बेस्टमध्ये संप सुरू केला आणि गिरणीक्षेत्रात पदार्पण केलं त्या वेळी काही धुरीणानी अंदाज प्रकट केला की, हेच डॉ. सामंताचे अत्युच्च शिखर ! या धुरीणांनी असं मत व्यक्त केलं की, एक्स्प्रेसमध्ये आणि गिरणीमध्ये जर डॉ. सामंत अपयशी ठरले तर तेथून त्यांच्या कार्याला उतरती कळा लागेल आणि ज्या तेजाने डॉ. सामंतांचा सूर्य वर वर सरकत गेला त्याच गतीने तो ढळूही लागेल !

या धुरीणांचा हा अंदाज खरा होतो की काय, असं आज नकळत वाटू लागलंय. कारण एक्स्प्रेसपाठोपाठ काही कारखाने आता सुरू होऊ लागले आहेत. तेही डॉ. दत्ता सामंतांचे नेतृत्व बाजूस सारूनच !

२० फेब्रुवारीपासून इंडियन एक्स्प्रेसची प्रकाशने डॉ. सामंताच्या कामगारांना बाहेर ठेवून पूर्ववत सुरू झाली आणि हाच पायंडा इतर कारखान्यातील कामगारांनी गिरवायास सुरवात केली. भारत फोर्ज, पटेल अॅल्युमिनिअम या कंपन्याबरोबरच आणखी एका कंपनीतील कामगारानी डॉ. सामंतांना रामराम ठोकून तब्बल एक वर्षानंतर कंपनीत प्रवेश केला आणि कामाला सुरवात केली या कंपनीचे नाव आहे पॉलिकेम लिमिटेड !

पॉलिकेम लिमिटेड या कंपनीचे महाराष्ट्रात एकूण तीन कारखाने आहेत. यातील एक कारखाना पुणे जिल्ह्यातील निरा येथे, दुसरा मुंबईतील गोरेगाव येथे, तर तिसरा मुबईतील चेंबूर येथे आहे.

या पॉलिकेम लिमिटेडमध्ये प्रसिद्ध कामगार-नेते श्री. जी. आर खानोलकर याच्या नेतृत्वाखालील एम्प्लॉईज युनियन बऱ्याच वर्षांपासून काम करीत होती. या युनियनमध्ये आणि कंपनीमध्ये २७ सप्टेंबर १९७८ रोजी एक करार झाला होता. या कराराची मुदत ११ मार्च १९८१ पर्यंत होती.

असे असतानाच एप्रिल १९८०मध्ये येथील कामगारांनी डॉ. दत्ता सामंताचे नेतृत्व स्वीकारले आणि ते महाराष्ट्र जनरल कामगार युनियनमध्ये सामील झाले. बहुमताचा दावा करून सामंत युनियनने लगेचच २५ जुलै १९८० रोजी मागण्याची सनद कंपनीला सादर केली. ३ मार्च १९८१ रोजी डॉ. सामंताच्या युनियनने कपनीला एक पत्र पाठवून मागण्यासाठी २३ मार्च ८१ पासून किंवा नोटीस मिळाल्यापासून १४ दिवसांनंतर केव्हाही संपावर जाण्याचा इशारा दिला आणि २३ मार्च पासून संप सुरूही केला!

डॉ. सामंतानी ज्या प्रकारे कारखान्यात प्रवेश करून हा संप सुरू केला ती पद्धत व्यवस्थापकाना कदापीही रुचणारी नव्हती. सामंताच्या मागण्यामुळे कंपनीवर सुमारे दोन कोटी रुपयांचा जादा बोजा पडणार होता. एवढी रक्कम देण्याची कंपनीची तयारी नव्हती. म्हणूनच कंपनीने प्रथमपासून ताठर भूमिका स्वीकारली.

कामगार आणि कंपनी यांच्या ताठर भूमिकांमुळेच हे सर्व प्रकरण कोर्टात गेले आणि मुंबईच्या दुसऱ्या कामगार न्यायालयाने हा संप बेकायदेशीर म्हणून घोषित केला. संप बेकायदेशीर ठरवूनही कामगार कामावर हजर झाले नाहीत, म्हणून राज्य सरकारने २८ सप्टें ८१ रोजी कामगारांच्या मागण्यांचा तंटा औद्योगिक न्यायाधिकरणाकडे सोपविला आणि संप पुढे चालू ठेवण्यास बंदी केली. कंपनीने नोटिसा लावून आणि वर्तमानपत्रांत जाहिराती देऊन कामगारांना तसे कळवले आणि कामावर रुजू होण्याचे आवाहनही केले ; पण तरीसुद्धा संपावरील एकही कामगार कामावर फिरकला नाही !

राज्य सरकारने या गोष्टीची कडकपणे नोंद घेतली. औद्योगिक तंटा कायद्यानुसार राज्य सरकारने डॉ. सामंत आणि कंपनीच्या गोरेगाव कारखान्यातील पाच कामगारांविरुद्ध फौजदारी गुन्ह्याचे प्रकरण न्यायालयात दाखल केले. त्यामुळे या सर्वांना आता कोर्टाच्या तारखाना हजर रहावे लागत आहे. संप बेकायदेशीर म्हणून घोषित झाल्यानंतरही तो पुढे चालू ठेवला, या कारणास्तव हा फौजदारी गुन्हा राज्य सरकारने नोंदविला आहे.

सरकारचे हे काम चालू असतानाच कंपनीने चेंबूरच्या कारखान्यात ३०-३५ कामगाराची नवीन भरती केली आणि ७ ऑक्टोबरपासून हा कारखाना सुरू केला. कंपनीची ही चाल डॉ. सामंताच्या कामगारांनी हाणून पाडण्याचा प्रयत्न केला, पण त्यात त्यांना यश आले नाही. मारहाणीच्या काही किरकोळ तक्रारी पहिल्या दोन दिवसांत ऐकायास मिळाल्या, पण नंतर तसेही फार काही घडले नाही.

आठ महिन्यांनंतर कंपनीने सुरू केलेल्या या नवीन भरतीने डॉ. सामंताचे कामगार विचलित झाले. त्यांचे मनोधैर्य खचू लागले. त्यातच नको ती आणखी एक घटना घडली. कॉंग्रेस (स) चे नेते व माजी मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी मध्यस्थी केली आणि पुणे जिल्ह्यातील निरा येथील पॉलिकेम कंपनी सुरू झाली. या कारखान्यातील २४० कामगारासाठी डॉ. सामंतांनी ६८ ते ७० लाख रुपयांची वार्षिक वाढ मागितली होती. याच कारणांसाठी हे कामगार संपावर होते. पण शरद पवारांनी मध्यस्थी करून प्रत्येक कामगाराला दरमहा १२५ रुपये वाढवून दिले. दहा महिन्यानंतर हे १२५ रुपये कामगाराना मिळाले, हे जरी खरे असले तरी ही रक्कम संप न करताही कंपनी देण्यास अनुकूल होती, असेही समजते.

राज्य सरकारने दाखल केलेला फौजदारी गुन्हा, 'कंपनीने सुरू केलेली नवीन भरती आणि त्यातच निरा येथील कामगारांनी ठोकलेला रामराम, या घटनांमुळे मुंबईतील पॉलीकेममधील कामगारामध्ये चलबिचल झाली. काय करावे हे त्यांना समजेना. अशातच इंडियन एक्स्प्रेसचा मोका साधून गोरेगाव येथील कामगार २५ फेब्रुवारीपासून, तर चेंबूर येथील कामगार २६ फेब्रुवारीपासून कामावर हजर झाले. डॉ सामंताचे नेतृत्व बाजूस सारून !

तुम्ही सहा-सहा महिने घरी बसण्याची तयारी ठेवा, तुम्हाला नक्की काही तरी मिळेल, असं डॉ. सामंत सर्वच कामगारांना प्रथमदर्शनी सागतात. काही ठिकाणी त्यांनी हा प्रयोग यशस्वीही करून दाखवला आहे. पण सर्वच ठिकाणी हे तंत्र साधतं असं नाही. पॉलिकेमच्या कामगारांनी पूर्ण एक वर्ष डॉ. सामंतांना साथ दिली. त्याचा प्रत्येक शब्द पाळला. पण दुर्दैवाने या युद्धात डॉ. सामंतांच्याकडून त्यांना काहीच न मिळाल्याने या कामगारानी पराभव पत्करला आणि ते कामावर रुजू झाले !

दहा-बारा लाख कामगार जवळ असताना सात-आठशे कामगाराची एक पॉलिकेम गेली म्हणून बिघडले कुठे, असं म्हणून डॉ. सामंतानी आणि त्याच्या अनुयायानी या गोष्टीकडे दुर्लक्ष करू नये. उद्योगधद्यात जसे काही मवाळ उद्योगपती असतात तसे काही जहालही असतात, हे ध्यानी ठेवून या लोकांनी प्रत्येक ठिकाणी एकच वापरली जाणारी आपली कार्यपद्धती आता बदलावी. अन्यथा दहा बारा लाखाचा आकडा केव्हा दहा-बारा हजारावर आला हेही या लोकांना समजणार नाही !

—मोहन शं. कुलकर्णी